CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ८४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विदर्भात पावसाचा जोर वाढणार

नागपूर : मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे या जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस सुरु आहे. हवामान विभागाकडून राज्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. विशेषत: मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर या जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. नंदूरबार, धुळे, जळगाव, नाशिक, पुणे जिल्ह्यातील घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर रत्नागिरी, सिंधुद्रुग, अहिल्यानगर, सातारा घाट परिसर आणि कोल्हापूर घाट परिसराला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उद्या नाशिक जिल्ह्यासाठी पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. यासोबतच आता विदर्भाबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

विदर्भातील काही भागांत पुढील ४८ ते ७२ तासांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. नागपूर, अकोला, अमरावतीसह अनेक जिल्ह्यांत चांगल्या पावसाचा अंदाज नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दक्षिणेकडील भागात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम विदर्भावर होत असून त्याच्या प्रभावामुळे पावसाच्या सरी तीव्र होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

## शेअर्समध्ये घसरण

मुंबई : मुकेश अंबानींच्या मालकीच्या रिलायन्स इंडस्ट्रीजचा सुमारे ४० टक्के हिस्सा असलेल्या आलोक इंडस्ट्रीजचा स्टॉक गेल्या काही दिवसांपासून गुंतवणूकदारांच्या रडारवर आहे. देशांतर्गत बाजारात गेल्या काही दिवसांपासून तेजीचा कल पाहायला मिळत आहे, त्याउलट मुकेश अंबानींनी गुंतवणूक केलेल्या कंपनीच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली आहे. गेल्या २२ महिन्यांत आलोक इंडस्ट्रीज लिमिटेडच्या शेअरमध्ये ५०% हून अधिक घसरण झाली असूनगुंतवणूकदारांचे अर्ध्याहून अधिक पैसे बुडाले. तसेच हा स्टॉक सध्या १३ रुपयांच्या खाली व्यवहार करत असून २३.५० रुपये या स्टॉकचा उच्चांक आहे.

## क्रेनच्या साहाय्याने बचाव कार्य!

सातारा : महाबळेश्वर तालुक्याला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. मुसळधार पावसामुळे वेण्णा नदीला पूर आला आहे. मुसळधार पाऊस आणि पुरामुळे वेण्णा नदीवरील छोटा पूल खचला. घटनास्थळी पर्यटकांची वाहने अडकल्याने नदीच्या पलिकडील हॉटेल्समध्ये अनेक पर्यटक अडकले होते. प्रशासन आणि बचाव पथकांनी क्रेनच्या साहाय्याने पर्यटकांची वाहने सुरक्षित बाहेर काढली आहेत. महाबळेश्र्वरमध्ये कालपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे शहरातील सखल भाग जलमय झाला आहे.वेण्णा लेकपरिसरातही मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. त्याच परिसरातील रस्ता अतिवृष्टीमुळे खचल्याने वेण्णा नदीचा पूल तुटला. त्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. पुलाच्या पलिकडील बाजूच्या हॉटेल्समध्ये राहणारे शेकडो पर्यटक तिथेच अडकून पडले.

## कोब्राची ४० पिल्ले सापडली

नागपूर : नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील नेरला गावात एका घरातून तब्बल ४० कोब्रा सापांची पिल्ले आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. राजू ढोमने यांच्या घरात ही घटना घडली आहे. एकाच ठिकाणी एवढ्या मोठ्या संख्येने कोब्रा सापांची पिल्ले आढळल्यामुळे काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, सर्पमित्र आणि वन विभागाच्या तत्परतेमुळे सर्व नागांची पिल्ले सुरक्षितपणे पकडून त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आली.

# मिसिंग लिंकवर दरड कोसळली !

तभा वृत्तसेवा



मुंबई : मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पाच्या एंट्री पॉईंटजवळ दरड कोसळल्याच्या घटनेनंतर राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सोमवारी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी), पोलीस प्रशासन आणि संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे डोंगरावरील पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात अचानक बदल झाला. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर दगड आणि माती घसरून खाली आली. मात्र, या घटनेमुळे कनेक्टिंग लिंकच्या मुख्य बोगद्याला कोणतीही संरचनात्मक हानी झालेली नसल्याचे प्राथमिक तपासणीत स्पष्ट झाले आहे. दरड कोसळल्यामुळे बोगद्याच्या प्रवेशद्वाराजवळील संरक्षणासाठी उभारण्यात आलेल्या स्लॅबचा काही भाग तसेच संरक्षक भिंतीचा भाग कोसळून रस्त्यावर पडला आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीवर तात्पुरता परिणाम झाला असून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे.सध्या परिसरात मुसळधार पाऊस आणि दाट धुके असल्याने डोंगराच्या माथ्यावरील परिस्थितीचे अचूक निरीक्षण करणे शक्य नसल्याचेही त्यांनी नमूद केले. पाऊस कमी झाल्यानंतर भू-तज्ज्ञ आणि अभियंत्यांकडून सविस्तर तांत्रिक पाहणी केली जाईल. पाण्याचा प्रवाह नेमका कशामुळे बदलला, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी कोणत्या कायमस्वरूपी उपाययोजना कराव्या लागतील, याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, रस्त्यावर पडलेला स्लॅब, दगड आणि इतर मलबा हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. संबंधित यंत्रणांना हे काम शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून परिसर पूर्णपणे सुरक्षित करण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.या मार्गावरील वाहतूक पूर्ववत सुरू करण्याबाबतचा अंतिम निर्णय पोलीस प्रशासन आणि एमएसआरडीसी यांच्या संयुक्त सुरक्षा पाहणी व जोखीम मूल्यांकनानंतरच घेतला जाणार आहे.नागरिकांच्या जीवितास कोणताही धोका निर्माण होणार नाही, याची पूर्ण खात्री झाल्यानंतरच रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असेही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी स्पष्ट केले.

# 'उग्रम' रायफल १०० दिवसांत तयार CAPF मध्ये समावेशासाठी सज्ज

वृत्तसंस्था



हैदराबाद : स्वदेशी संरक्षण उत्पादनाला चालना देण्याच्या भारताच्या मोहिमेत तेलंगणास्थित 'द्विपा डिफेन्स'ने एक मोठा टप्पा गाठला आहे. कंपनीच्या 'उग्रम' ७.६२५१ मिमी बॅटल रायफलने भारतीय लष्कर आणि गृह मंत्रालय यांच्या प्रमुख चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत. आता केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांकडून (उझक्ष) ही रायफल खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या 'आर्मामेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट' सोबत संयुक्तपणे विकसित केलेली 'उग्रम' रायफल अवघ्या १०० दिवसांत डिझाइन आणि तयार करण्यात आली आहे. देशातील सर्वात जलद स्वदेशी शस्त्र विकास कार्यक्रमांपैकी हा कार्यक्रम ठरला आहे.

रायफलने आर्मी जनरल स्टाफ क्वालिटेटिव्ह रिक्वायरमेंट चाचण्या, सर्व प्रकारच्या हवामानातील क्षेत्रीय मूल्यमापन (षळशश्रव शींरिश्रींरींळेपी) आणि गृह मंत्रालयाच्या बोर्ड चाचण्या यशस्वीपणे पार केल्या आहेत. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शिबू जोसेफ यांनी सांगितले की, द्विपा डिफेन्सला २०२१ मध्ये उत्पादनाचा परवाना मिळाला होता. त्यानंतर हैदराबादमध्ये तेलंगणा सरकारने दिलेल्या १३ एकरपेक्षा जास्त जागेवर कंपनीने एक सुसज्ज उत्पादन केंद्र उभारले आहे.

आमचा प्रवास २०२१ मध्ये मिळालेल्या मॅन्युफॅक्चरिंग लायसन्सने सुरू झाला. आज आम्ही १०० हून अधिक स्वदेशी शस्त्र प्रणाली आणि त्यांचे विविध प्रकारविकसित केले आहेत, ज्यामध्ये 'उग्रम' हे आमचे मुख्य उत्पादन म्हणून समोर आले आहे. भारतीय सुरक्षा दलांसाठी भारतातच जागतिक दर्जाची संरक्षण उत्पादने बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असेही जोसेफ यांनी स्पष्ट केले.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, या रायफलने दीर्घकाळ टिकण्याची आणि विश्र्वासार्हतेची व्यापक चाचणी पूर्ण केली आहे. आता सीआरपीएफ , आयटीबीपी , एसएसबी आणि एनएसजीद्वारे या रायफलच्या खरेदीची प्रक्रिया राबवली जाणार आहे. 'उग्रम' रायफलमध्ये आधुनिक गॅस-ऑपरेटेड रोटेटिंग बोल्ट सिस्टम आहे. या रायफलचे वजन ४ किलोग्रॅमपेक्षा कमी असून तिची प्रभावी क्षमता ५०० मीटर आहे.कंपनी सध्या असॉल्ट रायफल्स, कार्बाइन्स, सब-मशीन गन, लाइट मशीन गन आणि अँटी-ड्रोन सिस्टमसह स्वदेशी शस्त्रांची एक संपूर्ण मालिका विकसित करत आहे.

# मुंबईत अवघ्या सहा दिवसांत १० जणांचा मृत्यू

तभा वृत्तसेवा

मुंबई : यंदाच्या मान्सूनमध्ये मुंबईत पावसामुळे घडणाऱ्या दुर्घटनांचे प्रमाण वाढत असून, ३० जून ते ५ जुलै या अवघ्या सहा दिवसांत विविध घटनांमध्ये १० जणांचा मृत्यू झाला आहे. झाडे कोसळणे, उघडे मॅनहोल आणि घर कोसळण्याच्या घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.३० जून रोजी चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळल्याने ११ वर्षीय विहान श्रीवास्तव याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर झाडांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले.२ जुलै रोजी साकीनाका परिसरात उघड्या मॅनहोलमध्ये पडून ५५ वर्षीय अस्लम शेख यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर पावसाळ्यात मॅनहोल सुरक्षेबाबत प्रशासनावर टीका झाली.४ जुलै रोजी गोरेगाव पूर्व येथील आरे कॉलनीमध्ये झाड कोसळल्याने १८ वर्षीय तरुणाचा जीव गेला. मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे शहरातील अनेक भागांमध्ये झाडे पडण्याच्या घटना घडल्या.५ जुलै रोजी कुर्ला पश्र्चिम येथील नौपाडा परिसरात एका दुकानावर मोठी झाडाची फांदी कोसळली. या दुर्घटनेत ६३ वर्षीय युनूस कुंदावाला यांचा मृत्यू झाला. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले होते, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.याच दिवशी मानखुर्दमध्ये घर कोसळल्याची मोठी दुर्घटना घडली. या घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला, तर काही जण जखमी झाले. बचाव पथकांनी घटनास्थळी पोहोचून मदतकार्य राबवले.सलग घडणाऱ्या या दुर्घटनांमुळे मुंबईतील पावसाळी सुरक्षेवर पुन्हा प्रश्र्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांनी मुसळधार पावसाच्या काळात आवश्यक ती खबरदारी घ्यावी, धोकादायक ठिकाणांपासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अधिवेशनाला येणाऱ्या मंत्री, आमदारांनाही पावसाचा फटका; कामकाज स्थगित

तभा वृत्तसेवा



मुंबई : मुंबईसह राज्यभरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा आणि पूरपरिस्थितीचा मोठा फटका सर्वसामान्यांप्रमाणेच मंत्री आणि आमदारांनाही बसला आहे.

शनिवार आणि रविवारच्या सुट्ट्यांमुळे आपल्या मतदारसंघात गेलेले अनेक मंत्री आणि आमदार मुंबईत परतू न शकले नाही. रस्ते आणि रेल्वे मार्ग ठप्प झाल्याने, तसेच विमान सेवाही विलंबाने सुरू असल्याने अनेक लोकप्रतिनिधींना जागच्या जागीच अडकून पडावे लागले. त्यामुळे अनेकांनी मुंबईत येण्याऐवजी आपल्या मतदारसंघातच राहून मदतकार्याला प्राधान्य देणे पसंत केले. दरम्यान, मुंबईतील पावसाळी स्थिती लक्षात घेता विधानसभा आणि विधान परिषदेचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.

पावसाळी अधिवेशनाला दोन दिवस सुट्टी असल्याने विदर्भ आणि इतर दूरच्या जिल्ह्यातील अनेक आमदार आपल्या गावी गेले होते. सोमवारी सकाळी त्यांना कामकाजासाठी मुंबईत परतायचे होते, मात्र मुंबईतील तुफान पाऊस आणि कमी दृश्यमानतेमुळे विमान सेवा विस्कळीत झाली. नागपूर विमानतळावर सकाळी १०.०५ वाजता मुंबईसाठी निघणारे विमान विलंबाने आल्यामुळे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, काँग्रेस आमदार विकास ठाकरे आणि भाजप आमदार प्रवीण दटके यांना तब्बल दीड तास तिथेच ताटकळत राहावे लागले. दरम्यान, मुंबईतील अतिवृष्टीमुळे अधिवेशनाचे कामकाज स्थगित झाल्याची माहिती मिळताच, या तिन्ही नेत्यांनी मुंबईचा दौरा रद्द करून मतदारसंघातच थांबण्याचा निर्णय घेतला.

मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई परिसरातील आमदार वेळेत उपस्थित राहू शकले असले, तरी इतर भागांतील आमदारांची मोठी कोंडी झाली. पुणे- मुंबई रेल्वे आणि रस्ते वाहतूक पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे अनेक आमदार वाटेत अडकले. पहाटेच्या सत्रात ज्यांच्या विमानांचे कसेबसे उड्डाण होऊ शकले, ते आमदार मुंबईत पोहोचले खरे; मात्र तोवर परिस्थितीचे गांभीर्य पाहून विधानसभा अध्यक्षांनी कामकाज स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता. दुसरीकडे, कोकणातील काही मंत्री मुंबईत उपस्थित होते, परंतु महामार्गांवरील वाहतूक कोंडीमुळे कोकणातील आमदारांना मुंबई गाठता आली नाही.

अतिवृष्टीचा सर्वाधिक तडाखा बसलेल्या पालघर जिल्ह्यातील बहुतांश आमदारांनी मुंबईकडे न जाता मतदारसंघातच थांबण्याचा निर्णय घेतला. पालघरमध्ये पूरपरिस्थिती गंभीर असल्याने आणि रस्ते- रेल्वे बंद असल्याने या आमदारांनी स्थानिक पातळीवर प्रशासनासोबत रस्त्यावर उतरून मदत आणि बचावकार्य राबवण्याला प्राधान्य दिले.

मुंबईहून विमान वेळेत न उडाल्यामुळे नागपूरहून जाणाऱ्या आमदारांचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे विनाकारण अडकून पडण्यापेक्षा दुसऱ्या दिवशी जाणे योग्य ठरेल, असे आमदार प्रवीण दटके यांनी सांगितले. तर काँग्रेस आमदार विकास ठाकरे यांनी, आमदारांना मुंबईत पोहोचता आले नसल्यामुळे या आठवड्यातील कामकाजाचे दिवस वाढवून मिळावेत, अशी मागणी केली. दरम्यान, मंगळवारीही पावसाचा असाच जोर राहिल्यास अधिवेशनाच्या दैनंदिन कामकाजावर याचा विपरित परिणाम होणार आहे.

# अग्निवीरांना मिळणार कायमस्वरूपी नोकरी?



वृत्तसंस्था


नवी दिल्ली : जर तुमची 'अग्निवीर' बनण्याची इच्छा असेल, तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. 'अग्निपथ' योजनेअंतर्गत भरती झालेल्या अग्निवीरांना चार वर्षांच्या कार्यकाळानंतर नोकरीबाबत पूर्वी चिंता वाटत होती, परंतु आता ही चिंता दूर होण्याची शक्यता आहे.

वृत्तसंस्थेच्यावृत्तानुसार, नौदल आणि हवाई दलाने अग्निवीरांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याचा कोटा वाढवण्याचा प्रस्ताव सरकारला सादर केला आहे.सध्या, अग्निवीर म्हणून भरती झालेला जवान चार वर्षांच्या कालावधीसाठी देशाची सेवा करतो. या कार्यकाळानंतर, केवळ २५ टक्के अग्निवीरांना कायमस्वरूपी नोकरी दिली जाते. मात्र, या धोरणात लवकरच बदल होऊ शकतात. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नौदल आणि हवाई दलाने सरकारला हा कोटा वाढवण्याचे सुचवले आहे. लष्कर आणि हवाई दलाने हा कोटा २५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव दिला आहे, तर नौदलाने तो २५ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची सूचना केली आहे.अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीचा कार्यकाळ या वर्षाच्या अखेरीस संपणार आहे. चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर, सर्व अग्निवीरांना सेवेतून मुक्त केले जाईल. त्यानंतर, ज्यांना स्वेच्छेने सशस्त्र दलात सेवा सुरू ठेवायची आहे त्यांना संधी दिली जाईल; त्यापैकी ठराविक जणांना गुणवत्तेच्या आधारावर नियमित सैनिक म्हणून पुन्हा सेवेत सामावून घेतले जाईल.

# '६ जुलै'ला विधिमंडळाचे कामकाज ठप्प होण्याचा अजब योगायोग

## ६५ वर्षांच्या इतिहासातील तिसरी घटना; १९६१ आणि २०१८ मध्ये नागपुरात झाली होती 'बत्ती गूल'

तभा वृत्तसेवा




मुंबई :निसर्गाचा लहरीपणा आणि पावसाच्या हाहाकारामुळे सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी मुंबईत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले. महाराष्ट्राच्या संसदीय इतिहासाची पाने उलटली, तर ६ जुलैया तारखेचाएक अजब योगायोग समोर येतो. राज्याच्या ६५ वर्षांच्या इतिहासात मुसळधार पाऊस किंवा तांत्रिक बिघाडामुळे अधिवेशन संपूर्ण दिवसासाठी गुंडाळण्याची ही तिसरी वेळ आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीची अशीच एक सर्वात गाजलेली घटना याच तारखेला, म्हणजेच ६ जुलै १९६१ आणि नंतर २०१८ रोजी घडली होती. ठाणे आणि रायगड परिसरात ताशी ७० ते ९० किमी वेगाने वाहणारे वादळी वारे आणि कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे सोमवारी (६ जुलै) मुंबईत 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला. रस्ते आणि रेल्वे वाहतूक कोलमडल्याने, तसेच नागपूर व इतर भागांतून येणाऱ्या अनेक आमदारांची विमाने खोळंबल्यामुळे सभागृहात पुरेशी गणसंख्या (कोरम) नव्हती. अखेर कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या सुरक्षेचा विचार करून कामकाज थांबवण्यात आले.

या निमित्ताने ६ जुलैशी जोडलेल्या विधिमंडळाच्या जुन्या आठवणींना पुन्हा उजाळा मिळाला आहे. ठीक आठ वर्षांपूर्वी, म्हणजेच ६ जुलै २०१८ रोजी महाराष्ट्राने असाच एक प्रसंग अनुभवला होता. त्यावेळी राज्याचे पावसाळी अधिवेशन मुंबईऐवजी उपराजधानी नागपूरला घेण्यात आले होते. मात्र, आदल्या रात्री नागपूर शहराला मुसळधार पावसाने झोडपून काढले. त्या भीषण पावसामुळे विधानभवन परिसरातील तळघरात असलेल्या मुख्य ट्रान्सफॉर्मर रूममध्ये पाणी शिरले. मोठा अपघात किंवा शॉर्ट सर्किट टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण इमारतीचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

सकाळी जेव्हा कामकाज सुरू झाले, तेव्हा सभागृहात संपूर्ण अंधार होता. तात्कालीन विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांना त्यांच्या आसनापर्यंत सुरक्षित नेण्यासाठी सुरक्षा रक्षकांना आपल्या मोबाईलच्या फ्लॅशलाईटचा (टॉर्च) वापर करावा लागला होता. अखेर वीज येण्याची चिन्हे नसल्याने दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले होते.२०१८ च्या वीज खंडित होण्याच्या घटनेनंतर जेव्हा विधिमंडळ सचिवालयाने जुने अभिलेख (रेकॉर्ड्स) तपासले, तेव्हा अशीच एक जुनी नोंद समोर आली होती. १९६१ मध्ये जेव्हा नागपुरात पहिल्यांदाच पावसाळी अधिवेशन आयोजित करण्यात आले होते, तेव्हाही मुसळधार पावसामुळे ट्रान्सफॉर्मरमध्ये असाच तांत्रिक बिघाड झाला होता.

अनेक प्रयत्नांनंतरही वीजपुरवठा पूर्ववत होऊ न शकल्याने कामकाज एका दिवसासाठी पूर्णपणे थांबवावे लागले होते. - आता ६ जुलै २०२६ रोजी मुंबईत ओढवलेली परिस्थिती आणि घेतलेला निर्णय हा प्रोटोकॉलला अनुसरूनच होता. मात्र, १९६१ मधील तांत्रिक बिघाड, २०१८ मधील नागपूर विधानभवनातील अंधार आणि २०२६ रोजी मुंबईत पावसाने निर्माण केलेली परिस्थिती या तीनही घटना ६ जुलै या एकाच तारखेच्या धाग्याने जोडल्या गेल्याने संसदीय वर्तुळात या अजब योगायोगाचीच चर्चा रंगली आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रामायणमधील रामाच्या फर्स्ट लूकमागील दागिन्यांचे अनावरण

**मुंबई :** भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात महत्त्वाकांक्षी पौराणिक चित्रपटांपैकी एक असलेल्या रामायणमध्ये भगवान रामाच्या भूमिकेत दिसणाऱ्या रणबीर कपूरचा पहिला लूक जगासमोर येत असताना, पडद्यामागे कला, परंपरा आणि उत्कृष्ट कारागिरीची एक विलक्षण कहाणी उलगडत आहे. या भव्य सिनेमॅटिक प्रकल्पाचे अधिकृत ज्वेलरी भागीदार असलेल्या ट्राइब अम्रपालीने चित्रपटातील पात्रांसाठी आकर्षक आणि बारकाईने तयार केलेले दागिने साकारले आहेत. शतकानुशतके चालत आलेल्या पुराणकथा, प्रतीकात्मकता आणि भारतीय हस्तकलेचे आधुनिक पिढीसाठी दृश्य भाषेत रूपांतर करण्याचे कार्य या दागिन्यांमधून करण्यात आले आहे.नितेश तिवारी दिग्दर्शित आणि आयमॅक्स साठी चित्रित करण्यात आलेला रामायण हा भारतातील सर्वाधिक पूजनीय महाकाव्यांपैकी एकाचा भव्य सिनेमॅटिक पुनर्कथन आहे. हा चित्रपट दिवाळी २०२६ आणि २०२७ मध्ये जागतिक स्तरावर प्रदर्शित होणार आहे. सर्वकालीन महान महाकाव्यांपैकी एकापासून प्रेरणा घेत, नितेश तिवारी यांचे रामायण त्यातील कालातीत भावना आणि भव्यता एका विशाल सिनेमॅटिक स्वरूपात पुन्हा साकारण्याचा प्रयत्न करत आहे. चित्रपटात रणबीर कपूर भगवान राम, साई पल्लवी सीता, तर यश प्रभावशाली रावणाच्या भूमिकेत दिसणार आहेत. सनी देओल हनुमानाची भूमिका साकारणार असून, रवि दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत आहेत.

## ॲमेझॉन आपल्या नाऊ सेवेचा विस्तार करणार

**छत्रपती संभाजीनगर :** ॲमेझॉनने आज देशातील ३०० शहरांमधील ग्राहकांसाठी आपली अति-वेगवान सेवा ॲमेझॉन नाऊचा विस्तार केला आहे, तसेच भारतातील सर्वात मोठे काही मिनिटांत डिलिव्हरी करणारे नेटवर्क उभारण्याची घोषणा केली. ॲमेझॉन नाऊ हे भारतातील ॲमेझॉन इंडियाच्या इतिहासामधील सर्वात वेगाने वाढणारा ई-कॉमर्स बिझनेस युनिट बनले आहे. लाँच झाल्यापासून या युनिटच्या ऑर्डर्स प्रत्येक तिमाहीत दुप्पट झाल्या आहेत. ॲमेझॉन देशभरातील ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार उत्पादनांची सर्वात मोठी श्रेणी उपलब्ध करून देण्यासाठी आपल्या विशेष फुलफिलमेंट इन्फ्रास्ट्रक्चरचा विस्तार करणार आहे. यामध्ये हजारो उत्पादने काही मिनिटांत किंवा काही तासांत, एक दशलक्षहून अधिक उत्पादनांची विस्तृत श्रेणी त्याच दिवशी (सेम-डे), चार दशलक्षहून अधिक उत्पादने दुसऱ्या दिवशी आणि इतर लाखो उत्पादने अमर्यादित, मोफत आणि वेगवान प्राइम डिलिव्हरीद्वारे वितरित केली जातील.

## नवीन आरओ पाणी प्रकल्प सुरु केला

**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण भागातील नागरिकांना सुरक्षित आणि स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, सार्वजनिक आरोग्य सुधारण्यास मदत करणे आणि जलजन्य आजार टाळणे या उद्देशाने टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने कर्नाटकातील तुमकूर जिल्ह्यात रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) पिण्याच्या पाण्याच्या शुद्धीकरण प्रकल्पाची सुरुवात केली. या प्रकल्पाच्या भूमिपूजन समारंभाला श्री व्ही. सोमन्ना, माननीय रेल्वे राज्यमंत्री आणि जल शक्ती, भारत सरकार, तसेच टोयोटा किर्लोस्कर मोटरचे उपाध्यक्ष श्री. रमेश राव आणि कंपनीचे इतर वरिष्ठ इतरअधिकारी यावेळी उपस्थित होते.

## होम इंटिरिअर्स क्षेत्रात अचूक उत्पादन

**मुंबई :** भारतातील होम इंटीरियर्स बाजारपेठ आता कंत्राटदारांमार्फत होणाऱ्या विखुरलेल्या कामाकडून संघटित व तंत्रज्ञानावर आधारित डिझायनिंगकडे वेगाने बदलत आहे. या बदलामध्ये आता उत्पादन क्षमता ग्राहकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि फरक ठरवणारा घटक म्हणून समोर येत आहे. ग्राहकांच्या या प्रवासात डिझाइन जरी केंद्रस्थानी असले तरी कामातील सातत्य, गुणवत्ता, वेग आणि अचूकता प्रकल्प राबवणाऱ्या उत्पादन परिसंस्थेच्या ताकदीवर अवलंबून असतात. याच बदलाचे प्रतिबिंब म्हणून, होमलेन आणि डिझाइनकॅफे यांची मूळ कंपनी असलेल्या होमविस्टाने महाराष्ट्रातील भिवंडी येथे 56,000 चौरस फुटांचे नवीन एकात्मिक उत्पादन आणि वेअरहाउसिंग केंद्र कार्यान्वित केले आहे.

## शिवपुरीमध्ये 2,500 कोटींची गुंतवणूक

**शिवपुरी :** अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड (एईएल) ची संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रातील कंपनी अदाणी डिफेन्स अँड एरोस्पेसने आज मध्य प्रदेशातील शिवपुरी येथे 2,500 कोटीं रुपयांच्या प्रकल्पाचे भूमिपूजन केले. या प्रकल्पाअंतर्गत दक्षिण आशियातील सर्वात मोठी खासगी क्षेत्रातील क्षेपणास्त्र उत्पादन व्यवस्था उभारली जाणार आहे. या प्रकल्पात एकाच ठिकाणी कंपोझिट प्रोपेलंट आणि ट्रायनायट्रोटोल्युईन (टीएनटी) उत्पादनाची अत्याधुनिक सुविधा उभारली जाईल. त्यामुळे भारतात खासगी क्षेत्रात प्रथमच मोठ्या प्रमाणावर एकात्मिक क्षेपणास्त्र उत्पादन क्षमता विकसित होणार आहे. या गुंतवणुकीमुळे सुमारे 5,000 प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कुशल रोजगार निर्माण होतील. तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) नव्या व्यवसायाच्या संधी मिळतील. या प्रकल्पामुळे मध्य प्रदेश संरक्षण उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र म्हणून अधिक मजबूत होईल.

## नेक्स्ट भारत व्हेंचर्सतर्फे 2,000 कोटी रु. चा इम्पॅक्ट व्हेंचर फंड सादर

**दिल्ली:** नेक्स्ट भारत व्हेंचर्स आयएफएससी प्रायव्हेट लिमिटेडने आज आपला दुसरा 2000 कोटी रु.चा फंड सुरु करत असल्याची घोषणा केली. यामुळे हा फंड भारतातील सर्वात मोठ्या इम्पॅक्ट-केंद्रित व्हेंचर फंडांपैकी एक ठरला आहे. या दुसऱ्या निधीमुळे नेक्स्ट भारतला ग्रामीण भारत तसेच स्थलांतरित आणि शहरी वंचित समुदायांमधील जीवनमान आणि शाश्वत उपजीविका सुधारण्यासाठी कार्य करणाऱ्या 'इम्पॅक्ट उद्योजकांना' अधिक व्यापक पातळीवर पाठबळ देणे शक्य होणार आहे.नेक्स्ट भारत व्हेंचर्स ही 2 वर्षांपूर्वी स्थापन झालेली संस्था असून ती कृषी, ग्रामीण पुरवठा साखळी, वित्तीय समावेशन, आरोग्यसेवा, ग्रामीण भागातील दळणवळण आणि सामाजिक हितासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) अशा क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करते. हा उपक्रम 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत 2047' या भारताच्या राष्ट्रीय प्राधान्यक्रमांशी सुसंगत असून स्थानिक पातळीवर उभारल्या जाणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देतो. हे उद्योग रोजगारनिर्मिती, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, ग्रामीण मूल्यसाखळी अधिक सक्षम करणे आणि महिला-नेतृत्वाखालील उद्योजकतेला चालना देण्याचे कार्य करतात.

## सीजी सेमीकडून व्यावसायिक उत्पादनास सुरुवात

**साणंद :** मुरुगप्पा समूहातील सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेड, रेनेसस इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन आणि स्टार्स मायक्रोइलेक्ट्रॉनिक्स यांच्या संयुक्त उपक्रमातून स्थापन झालेली सीजी सेमी प्रायव्हेट लिमिटेड (सीजी सेमी) ही कंपनी आहे. गुजरातमध्ये मुख्यालय असलेल्या सीजी सेमीने आज साणंद येथील आपल्या जी1 आउटसोर्स्ड सेमीकंडक्टर असेंब्ली अँड टेस्टसुविधेमध्ये व्यावसायिक उत्पादनाच्या सुरुवातीची घोषणा केली. या कार्यक्रमाचे उद्घाटन भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी, गुजरातचे माननीय मुख्यमंत्री श्री. भूपेंद्र पटेल आणि रेल्वे, माहिती आणि प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री माननीय श्री. अश्विनी वैष्णव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ०६-०७-२०२६

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, संदीप ज्ञानेश्वर काळे व सौ. मिरा संदीप काळे यांनी मोहल्ला वॉर्ड क्र. 5 स.नं.----- मधील प्लॉट / घर क्रमांक 83.16 चौ. मी. त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्व : 9 मीटर रोड व वापर — पश्चिम : लागून गट
दक्षिण : 9 मी. रोड व वापर — उत्तर : रो.हाऊस नं. 16
आकार : पूर्व पश्चिम 83.16 चौ.फुट दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

# अजिंठा घाटात वाहणाऱ्या पाण्यामध्ये मुरुम आल्याने नाल्या झाल्या बंद

**तभा वृत्तसेवा**

फर्दापूर दि 5. छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात नाल्या बंद असुन झाडे तसेच दगड लटकलेल्या अवस्थेत आहे छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात सध्या फर्दापूर परिसरात रिमझिम पाऊस असल्याने तरी हि अजिंठा घाटात नाले सफाई तसेच डोंगराच्या कड्यावर झाडे दगड लटकलेल्या अवस्थेत आहे तरी हे काढण्याची फुरसत या विभागला दिसत नाही यामुळे या नाल्या साफ केल्या नाही तर पावसाचे पाणी मुख्य रस्त्यावर येऊन रस्त्यावर या पाण्याने पुन्हा खड्डे पडतील आणि मोठ्या प्रमाणात अपघात होण्याची दाट





शक्यता आहे यामुळे या घाटात नाले सफाई व झाडे लटकलेल्या अवस्थेत असलेली दगड काढण्याचे काम करण्यात यावे अशी मागणी चालक करित आहे

# 5 मिनिटांत 100 प्रश्न...'; अन् राज्यभर गाजला भोकरदनचा डंका!

## राज्यस्तरीय अबॅकस इंटेलिजन्स स्पर्धेत भोकरदनच्या विद्यार्थिनींचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर /छ.संभाजीनगर दि.६:** मेहनत कधीच वाया जात नाही, याची प्रचिती पुन्हा एकदा भोकरदनच्या विद्यार्थिनींनी करून दिली आहे.राज्यस्तरीय अबॅकस इंटेलिजन्स स्पर्धत येथील विद्यार्थिनींनी दमदार कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. अवघ्या ५ मिनिटांत १०० गणिती प्रश्न अचूक सोडवत कु.आरोही अजय व्यवहारे ने आपल्या असामान्य बौद्धिक क्षमतेचा ठसा उमटवला.

राज्यभरातून सहभागी झालेल्या शेकडो स्पर्धकांमध्ये भोकरदनच्या विद्यार्थिनींनी आपल्या वेगवान गणनकौशल्याने आणि अचूकतेने विशेष लक्ष वेधून घेतले. या यशामागे विद्यार्थिनींचा सातत्यपूर्ण सराव, पालकांचे प्रोत्साहन आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. आरोहीच्या यशामागे सातत्य सराव,कुटुंबाचे प्रोत्साहन,प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

**अबॅकसचे फायदे..**

वेगवान गणना क्षमता,एकाग्रता वाढते,स्मरणशक्ती मजबूत होते.;आत्मविश्वास वाढतो; परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वास असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नाही.

- आरोही अजय व्यवहारे, यशस्वी विद्यार्थिनी भोकरदन

# महर्षी कर्वे यांचा स्त्रीशिक्षणाचा वारसा जपण्याचा निर्धार; एस.एन.डी.टी. विद्यापीठाचा 111 वा स्थापना दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**




**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील पहिल्या महिला विद्यापीठाचा मान असलेल्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचा १११ वा स्थापना दिन ए.ई.व्ही.पी.एम. वुमन्स कॉलेजमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या स्त्रीशिक्षणाच्या विचारांचा वारसा पुढे नेत विद्यार्थिनींना गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि नेतृत्वक्षमतेद्वारे सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. केजल भारसाखळे होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी, "महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणासाठी पेटविलेला ज्ञानाचा दीप आजही समाजाला दिशा देत आहे. प्रत्येक विद्यार्थिनीच्या यशातून त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी महाविद्यालय कटिबद्ध आहे," असे सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. विद्यार्थिनींनी विद्यापीठ गीत सादर करून कार्यक्रमाला सुरुवात केली. प्राचार्या डॉ. वर्षा गायगोळे यांनी प्रास्ताविकात एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या १११ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत महिला शिक्षणातील योगदान अधोरेखित केले.

प्रमुख पाहुण्या डॉ. स्वाती नखाले यांनी महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास, संशोधन आणि नेतृत्व विकासाचे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थिनींनी ज्ञानासोबत सामाजिक बांधिलकीही जोपासावी, असे आवाहन केले. विद्यार्थिनी प्रतिनिधीने मनोगत व्यक्त करत विद्यापीठ व महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक संधींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

प्रा. प्रवीण पाव्हरे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. सारिका हनवते यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थिनी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झी टीव्हीवर 'माँ है ना'चा टेलिव्हिजन प्रीमिअर; आई-मुलांच्या नात्याचा अनोखा उत्सव

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** झी 5 वर प्रेक्षकांची पसंती मिळविल्यानंतर कॉमेडी-कुकिंग रिॲलिटी शो 'माँ है ना' आता प्रथमच झी टीव्हीवर प्रसारित होत आहे. 4 जुलैपासून हा कार्यक्रम दर शनिवार व रविवारी सायंकाळी 6 वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अभिनेत्री शिल्पा शेट्टी कुंद्रा यांच्या सूत्रसंचालनाखाली साकारलेल्या या कार्यक्रमात विविध लोकप्रिय सेलिब्रिटी आपल्या आई किंवा कुटुंबीयांसह स्वयंपाकाची आव्हाने स्वीकारताना दिसणार आहेत. स्वादिष्ट पाककृतींसोबतच आई-मुलांमधील प्रेम, आठवणी, भावनिक संवाद, कौटुंबिक मूल्ये आणि मनोरंजनाचा सुरेख मिलाफ या शोमध्ये अनुभवायला मिळणार आहे. झी5 वरील यशानंतर आता टेलिव्हिजनवरही हा कार्यक्रम प्रेक्षकांना हसवणारे, भावूक करणारे आणि मातृत्वाच्या नात्याचा सुंदर उत्सव साजरा करणारे अविस्मरणीय क्षण देणार आहे.

# रिमझिम पावसात हिरवळीने नटलेली अजिंठा लेणी



फर्दापूर दि 5. जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरात सध्या रिमझिम पाऊस पडत असल्याने ती हिरवाईने नटलेली आहे तसेच रविवार सुट्टी असल्याने पर्यटकांची संख्या वाढली होती यामध्ये विविध राज्यांतील पर्यटक आले होते परंतु विदेशी पर्यटक यांची संख्या सध्या कमी प्रमाणात असल्याने व्यवसायिक यांचा व्यवसाय मंदावला असल्याने व्यवसायिक यांच्या मध्ये चिंता वाढली आहे.

# जैन टॅग तर्फे विद्यार्थ्यांसाठी मोफत जादूच्या कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणे आणि शिक्षणासोबत मनोरंजनाचा सुंदर संगम घडवून आणण्याच्या उद्देशाने जैन टॅग तर्फे ७ जुलै रोजी दोन शाळांमध्ये मोफत जादूच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत नवजीवन स्कूल येथे सकाळी १०.३० वाजता आणि पी. यू. जैन स्कूल येथे दुपारी २:३० वाजता आकर्षक जादूच्या प्रयोगांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ शेकडो विद्यार्थी घेणार असून, त्यांना आनंदासोबत प्रेरणादायी अनुभवही मिळणार आहे. यावेळी जैन टॅग च्या अध्यक्षा सौ. जयश्री लोहाडे म्हणाल्या,"मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य हीच आमच्यासाठी सर्वात मोठी प्रेरणा आहे. शिक्षणासोबत आनंद, सर्जनशीलता आणि सकारात्मक विचारांची जोड मिळावी, या हेतूने हा उपक्रम आयोजित केला आहे या कार्यक्रमासाठी प्रोजेक्ट चेअरमन रचना पहाडे कीर्ती पाटनी मिताली काला सपना पाटनी सारीका बडजाते दिपाली पाडे यानी समाजहितासाठी असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्याचा जैन टॅग चा संकल्प केला आहे " समाजोपयोगी, शैक्षणिक आणि संस्कारक्षम उपक्रम सातत्याने राबवत असून, भविष्यातही विद्यार्थी, महिला आणि समाजाच्या हितासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेतर्फे देण्यात आली.

# पैठणमध्ये ड्रग्ज विरोधात जनजागृती अभियान संपन्न

**पैठण प्रतिनिधी दि ०६ :-** छत्रपती संभाजीनगर ग्रामीण: पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकल्पनेतून, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने 'अमली पदार्थ विरोधी अभियान' राबवण्यात येत आहे. याच अभियानाचा एक भाग म्हणून, पोलीस ठाणे पैठण आणि अमली पदार्थ विरोधी पथक यांच्या संयुक्त विद्यमाने पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयात एक विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या माध्यमातून युवा पिढीला अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थितांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्यांचे मानवी जीवनावर होणारे घातक परिणाम आणि नशामुक्त जीवनाचे फायदे यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी 'अमली पदार्थांना ठामपणे नकार' (Say No To Drugs) हा संदेश देण्यात आला

कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयाच्या आवारात आणि परिसरात जनजागृतीचे फलक लावण्यात आले , पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक आणि पोलीस अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

या उपक्रमाद्वारे समाजाला 'व्यसनमुक्त समाज, सुरक्षित भविष्य' घडवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ए.पी.आय पवार,पी.एस.आय खंडागळे,हेड कॉन्स्टेबल गायकवाड, पवार, घुले, भालेराव तसेच प्रतिष्ठान महाविद्यालयाचे स्टाफ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# भारत-अनुकूल परिस्थितीची सुरुवात : श्रीजित बालसुब्रमण्यन

**पुणे :** अमेरिका-इराण करार आणि स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ (हॉर्मुझची सामुद्रधुनी) मधील जहाजांची वाहतूक पूर्ववत होणे, हे जागतिक अर्थव्यवस्थेच्या परस्पर संबंधांचा विचार करता अत्यंत महत्त्वाचे आहे. स्पॉट आणि फ्युचर्स बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या किमती युद्धपूर्व पातळीवर, म्हणजेच प्रति बॅरल ७० अमेरिकन डॉलर्सहून अधिकवर परत आल्या असल्याचे बंधन एएमसीचे उपाध्यक्ष व इकॉनॉमिस्ट (फिक्स्ड इन्कम) श्रीजित बालसुब्रमण्यन यांनी सांगितले.



ते पुढे म्हणाले, सध्या तरी, बाजारपेठेचा विश्वास आहे की, तेलाचा वाढलेला पुरवठा (इराणचे तेल कदाचित सवलतीच्या दरात उपलब्ध झाल्यामुळे) हा साठा पुन्हा वाढवण्याच्या मागणीपेक्षा अधिक प्रभावी ठरेल. याशिवाय ॲल्युमिनियम आणि युरियाच्या किमतीही लक्षणीयरित्या घसरल्या आहेत, तसेच जहाजांच्या विमा खर्चातही घट होण्याची शक्यता आहे. या सर्व घडामोडींमुळे महागाई, आर्थिक वाढ आणि धोरणनिर्मितीवरील ताण कमी होणार आहे.

भारतासाठी, या जागतिक घडामोडींमुळे आणि अलीकडच्या धोरणात्मक उपायांमुळे परिस्थिती अनुकूल झाली आहे. ५ जून रोजी, रिझर्व्ह बँकेने अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना जाहीर केल्या, ज्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे. एफएआर जी-सेक व्याप्ती वाढवणे, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या (पीएसयू) बाह्य व्यावसायिक कर्जांसाठी सवलतीच्या दरात एफएक्स (परदेशी चलन) स्वॅप उपलब्ध करणे, निर्यातीतून मिळणाऱ्या पैशांच्या वसुलीची मुदत पुन्हा ९ महिन्यांवर आणणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ३० सप्टेंबरपर्यंत गोळा होणाऱ्या ३ ते ५ वर्षांच्या एफसीएनआर (बी) ठेवींसाठी संपूर्ण हेजिंग खर्च सोसणारे एफएक्स स्वॅप देणे. दुसरीकडे, सरकारने विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) सरकारी रोख्यांमध्ये केलेल्या गुंतवणुकीवरील कॅपिटल गेन्स (भांडवली नफा) आणि व्याज या दोन्हीवर कर सवलत जाहीर केली आहे (ज्यामुळे भारताचा ब्लूमबर्ग ग्लोबल ॲग्रीगेट बाँड इंडेक्समध्ये समावेश होण्यास मदत होऊ शकते).

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. 448/2026
अर्जदार : प्रकाश यमाजी नितनवरे, रा.मु. पो. नरसापुर, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर
विरुध्द
गैरअर्जदार : निरंक
प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. व्ही.जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन चंद्रभागाबाई यमाजी नितनवरे यांचा दि. 13/10/2013 रोजी मौजे नरसापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत चंद्रभागाबाई यमाजी नितनवरे यांचे पती नामे यमाजी सयाजी नितनवरे यांचा अर्जदार लहान असतानाच मौजे नरसापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत चंद्रभागाबाई यमाजी नितनवरे आणि मयत यमाजी सयाजी नितनवरे हे आपसात पती पत्नी होते. त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार यांचा जन्म झाला आहे. मयत चंद्रभागाबाई यमाजी नितनवरे आणि मयत यमाजी सयाजी नितनवरे यांना अर्जदार मुलगा या नात्याने एकमेव कायदेशीर वारस असुन त्यांचे शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस मयतांना नाही. करीता उक्त अर्जदारास शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन 30 दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक 06/07/2026 रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक. — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## संक्षिप्त वृत्त...

### कमलताई राठोड यांची शिवसेना ओबीसी जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती : आमदार सईद खान यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

**परभणी,/प्रतिनिधी :** शिवसेनेच्या संघटनात्मक विस्ताराला अधिक बळ देण्याच्या उद्देशाने परभणी जिल्ह्यात ओबीसी आघाडीची नव्याने बांधणी करण्यात येत असून, पाथरी तालुक्यातील देवनांद्रा येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. कमलताई बळीराम राठोड यांची शिवसेना ओबीसी जिल्हाप्रमुख, परभणी या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख तथा आमदार सईद खान यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

नियुक्तीनंतर कमलताई राठोड यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार व्यक्त करत शिवसेनेची संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी तसेच ओबीसी समाजाच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने कार्य करण्याची ग्वाही दिली. तर आमदार सईद खान यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याचे आवाहन केले. शिवसेनेची ध्येयधोरणे गावागावांपर्यंत पोहोचविताना ओबीसी समाजाच्या समस्या व प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी उपनगराध्यक्ष आलोक चौधरी, नगरसेवक गोविंद हारकाळ, नाईक, चाऊस, लालू खान, सुनंदाताई फलके, मिरा इगवे, वंदना जोंधळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, नरेंद्र नगर, देवनांदा (ता. पाथरी) येथील रहिवासी असलेल्या कमलताई राठोड या सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे पाथरी तालुक्यासह परिसरातील महिला आणि ओबीसी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### अहिल्यादेवी होळकर विचारमंचद्वारे दहावी, बारावी व स्पर्धा परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

**परभणी,/प्रतिनिधी :** अहिल्यादेवी होळकर विचारमंचच्या वतीने लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती तसेच दहावी, बारावी आणि विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन शनिवारी (दि. ५) शहरातील शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करत त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले हे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत साखरे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. शेळके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांनी लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा व विचारांचा आढावा घेत समाजहितासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण केले.

या प्रसंगी धनगर समाजातील दहावी, बारावी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामागील परिश्रम, जिद्द आणि पालकांचे योगदान यांचा गौरव करत उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून समाजाचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अहिल्यादेवी होळकर विचारमंचचे प्रसाद लेंगुळे, अनंत बनसोडे, बालाजी कोकणे, माणिक काळे, सुभाष शेंगुळे, राजेंद्र तुडमे, चंद्रकांत साखरे, विठ्ठल शेळके, संतोष टरपले, देविदास शिंपले, आसाराम देवकते, अनिल बसुळे, ज्ञानोबा शेळके, सुनील हिंगे, रघुनाथ जानकर, राजेश बालटकर यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमास समाजबांधव, पालक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### पीएच.डी. पदवीप्राप्तीबद्दल डॉ. विकास गवई यांचा सपत्नीक सत्कार

**सेलू,/प्रतिनिधी:** नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू यांच्या वर्धापनदिन व संस्थापक कै. श्रीरामजी भांगडिया स्मृतिदिनानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात नूतन महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्राध्यापक डॉ. विकास गवई यांचा नुकतीच प्राप्त झालेल्या पीएच.डी. पदवीबद्दल संस्थेच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या शैक्षणिक संशोधन कार्याचा गौरव करत मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

डॉ. विकास गवई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील इतिहास विभागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रांचा सामाजिक जीवनावर पडलेला प्रभाव : एक चिकित्सक अभ्यास (इ.स. १९२० ते इ.स. १९५६) या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. नूतन महाविद्यालयात अध्यापनाची जबाबदारी सांभाळत असतानाच त्यांनी हा संशोधन प्रबंध पूर्ण करून विद्यापीठात सादर केला. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेत विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली.

याच कार्यक्रमात डॉ. गवई यांनी संस्थापक कै. श्रीरामजी भांगडिया यांच्या जीवनकार्यावर लिहिलेला विशेष लेख संस्थेला भेटस्वरूपात प्रदान केला. या लेखाचे विमोचन नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचा इतिहास जतन करण्यासाठी तसेच संस्थापकांच्या कार्याचा परिचय नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी हा लेख द्यावा

# साईबाबा नागरी सहकारी बँकेला १.५९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा

**३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात; सर्व शाखा नफ्यात, ठेवी २६७ कोटींवर**

**सेलू ,/प्रतिनिधी:-** साईबाबा नागरी सहकारी बँक, सेलूची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. ५) स्वामी रामानंद तीर्थ हिंदी-मराठी ग्रंथालय येथे उत्साहात पार पडली. बँकेचे संस्थापक अध्यक्ष हेमंतराव आडळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. बँकेने मागील आर्थिक वर्षात १ कोटी ५९ लाख १२ हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळविल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच संचालक मंडळाने शिफारस केलेल्या १० टक्के लाभांशास सभेने मंजुरी दिली.

सभेची सुरुवात साईबाबांच्या मूर्ती पूजनाने करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष मिलिंद सावंत, उपाध्यक्ष चंद्रशेखर मुळावेकर, माजी नगराध्यक्ष पवन आडळकर, प्रा. प्रभाकर रावते, मधुकर नाना पौळ, कोलते, उद्धवराव सोळके, ए. टी. गजमल तसेच संचालक बालचंदानी कन्हैयालाल, प्रवीणचंद बिनायके, दत्तात्रय आंधळे, ओम तोष्णीवाल, राजेंद्र माणियार, सुभाष चव्हाण, ॲड. भगवान सिरसाठ, नंदकिशोर बहिवाल, शेख इम्रान, गंगाधर आडळकर, कांचन प्रताप, तज्ज्ञ संचालक संजय मगर आणि भाऊसाहेब मोगल यांची प्रमुख उपस्थिती होती.

सभेचे प्रास्ताविक व विषयपत्रिकेची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी रामराव लाडाने यांनी दिली, तर वार्षिक अहवालाचे वाचन संचालक पवन आडळकर यांनी केले. यावेळी नुकत्याच निवडून आलेल्या नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. नगराध्यक्ष मिलिंद सावंत, प्रा. प्रभाकर रावते, ड. गोविंद शेळके, गोपीकिशन दायमा, इलियासभाई, दिलीप दासळकर, रहीम खान आदींनी मनोगत व्यक्त केले.

सभेत सादर करण्यात आलेल्या आर्थिक अहवालानुसार मार्च २०२६ अखेर सर्व कर व आवश्यक तरतुदी वजा जाता बँकेला १ कोटी ५९ लाख १२ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. बँकेचे वसूल भागभांडवल ७ कोटी २१ लाख रुपये असून स्वनिधी २५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. मार्चअखेर बँकेच्या एकूण ठेवी २६७ कोटी २२ लाख रुपये असून कर्जवाटप १५४ कोटी रुपये झाले आहे. बँकेचे एनपीए प्रमाण केवळ १.०५ टक्के असून एकूण सभासद संख्या १० हजार ३६५ इतकी आहे. बँकेला 'अ' वर्गाचा लेखापरीक्षण दर्जा प्राप्त झाला असून सर्व शाखा नफ्यात कार्यरत असल्याची माहिती अध्यक्ष हेमंतराव आडळकर यांनी दिली.

यावेळी बोलताना हेमंतराव आडळकर यांनी सभासदांच्या विविध प्रश्नांची उत्तरे देत बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम झाल्याचे सांगितले. गेल्या सलग १४ वर्षांपासून बँक १० टक्के लाभांश वितरित करीत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच बँकेला आतापर्यंत १२ वेळा विविध मानाचे पुरस्कार प्राप्त झाले असून, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह असोसिएशनचा पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक पुरस्कार, बेस्ट चेअरमन, बेस्ट डायरेक्टर आणि बेस्ट सीईओ पुरस्कारांनीही बँकेचा गौरव झाल्याचे त्यांनी सांगितले.

ग्राहक आणि सभासदांनी एटीएम, पीओएस, ई-कॉमर्स, मोबाईल बँकिंग, क्यूआर कोड यांसारख्या आधुनिक बँकिंग सुविधांचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसुली अधिकारी संतोष हुगे यांनी केले, तर आभार व्यवस्थापक निसार पठाण यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दत्ता पौळ, अविनाश आडळकर, शेख अबूजर, गुलाब सोनवणे, सुरेश आढे, आनंद मोरे, कैलास गव्हाणे, किशोर विटेकर, शेख अशफाक, भास्कर, सुनील आडळकर, उमेश खरावणे, अजय मरळी, संतोष जायभाय, गोकुळ पारखे, विकास आकात, चेतन परदेशी, वैभव शिंदे, विठ्ठल चव्हाण यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## १६५ वर्षांची परंपरा जपत वालूरकर दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**माउलींच्या पालखी सोहळ्यात १५ क्रमांकाचा मान; हरीनामाच्या जयघोषात वारकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील श्रीक्षेत्र वालूर येथील वै. हभप अण्णासाहेब महाराज आणि वै. हभप बापूसाहेब महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरीची वारी करणाऱ्या वालूरकर दिंडीने हरीनामाच्या गजरात आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान केले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात माउलींच्या रथामागे १५ क्रमांकाचा मान असलेल्या या दिंडीचे प्रस्थान वै. हभप अण्णासाहेब महाराज यांच्या समाधीस्थानावरून ४ जुलै रोजी झाले. यंदा या दिंडीच्या अखंड परंपरेचे १६५ वे वर्ष असून, सध्या दिंडीचे नेतृत्व हभप पुरुषोत्तम महाराज वालूरकर करत आहेत.

वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा जपत वालूरकर दिंडी गेली दीडशेहून अधिक वर्षे पंढरीची वारी करत आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या 'पंढरीची वारी आहे माझे घरी, आणिक न करी तीर्थव्रत' या अभंगवचनाचा प्रत्यय देत भगवान श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी हजारो वारकरी आषाढी वारीत सहभागी होत आहेत. ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता विठ्ठलनामाचा अखंड गजर करीत भाविक पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात मानाचे स्थान मिळालेल्या वालूरकर दिंडीचा वारकरी संप्रदायात विशेष सन्मान आहे. दिंडीतील वारकरी टाळ-मृदुंगाच्या गजरात अभंग, भजन आणि हरिनामाचा जयघोष करीत पंढरीची वाट चालत आहेत. पंढरपूर येथे वालूरकर दिंडीचा स्वतंत्र मठ असून, वारकरी परंपरेच्या जतनासाठी या दिंडीचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.

आषाढी वारीच्या परंपरेनुसार मंगळवार, ७ जुलै रोजी श्रीक्षेत्र आळंदी येथील संत ज्ञानेय्वर महाराज मंदिरात तसेच रविवार, १२ जुलै रोजी श्रीक्षेत्र सासवड येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसमोर मानाच्या कीर्तनाची परंपरा अखंडपणे पार पडणार आहे. अनेक दशकांपासून सुरू असलेली ही धार्मिक परंपरा आजही श्रद्धा, भक्ती आणि वारकरी संस्कृतीचे दर्शन घडवित आहे.

वालूरकर दिंडीच्या प्रस्थानावेळी ग्रामस्थ, वारकरी, भाविक आणि भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिंडीला निरोप दिला. विठ्ठलनामाच्या गजराने परिसर भक्तिमय झाला.

## वारकऱ्यांच्या सेवेसाठी ७ ते १३ जुलैदरम्यान मोफत आरोग्य सेवा शिबिर

**परभणी ,/प्रतिनिधी-:** आषाढी एकादशीच्या निमित्ताने विदर्भातून पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी 'सवंगडी कट्टा सामाजिक समूह' यंदाही सज्ज झाला असून, ७ जुलै ते १३ जुलै या कालावधीत शहरातील संत जनाबाई मंदिर येथे मोफत आरोग्य सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत होणाऱ्या या सेवा उपक्रमाची सर्व तयारी पूर्ण झाली असून, वारकऱ्यांच्या सेवेला अधिक व्यापक आणि संस्मरणीय स्वरूप देण्याचा निर्धार समूहातील सदस्यांनी व्यक्त केला आहे.

शहरातील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या नागरिकांनी स्थापन केलेल्या 'सवंगडी कट्टा सामाजिक समूहा'तर्फे दरवर्षी पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध मोफत सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. यंदा सेवेच्या सलग ११व्या वर्षात हा उपक्रम प्रवेश करत असून, संत जनाबाई मंदिर परिसरात मुक्कामी येणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या सेवा उपक्रमाचा शुभारंभ गुरुवर्य सेलूकर महाराज यांच्या हस्ते होणार असून, विविध क्षेत्रांतील मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

पंढरपूरकडे जाणाऱ्या सुमारे ७० पालख्या गंगाखेड मार्गे प्रवास करतात. संत जनाबाई मंदिर परिसरात त्यांच्या मुक्कामाची व्यवस्था होत असल्याने याच ठिकाणी वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी, औषधांचे वाटप, हात-पायांची मसाज सेवा, मोबाईल चार्जिंग पॉइंट आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. संत जनाबाई यांच्या जन्मभूमीत भाविकांना या सर्व सेवा पूर्णपणे मोफत मिळणार असून, हजारो वारकरी त्याचा लाभ घेतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

आरोग्य शिबिरासाठी गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. हेमंत मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ महिला व पुरुष डॉक्टरांची टीम सेवेसाठी सज्ज झाली आहे. डॉ. योगेश मलूरवार, डॉ. कैलास चांदकर, डॉ. देविदास चव्हाण, डॉ. सचिन सुपेकर, डॉ. किशोर कुगणे, डॉ. मनीष बियाणी, डॉ. सचिन पवार, डॉ. बागेश्री भरड, डॉ. काबरा, डॉ. शोभा कदम, डॉ. स्नेहा तोष्णीवाल, डॉ. अर्चना निरस यांच्यासह अन्य वैद्यकीय तज्ज्ञ या सेवेत सहभागी होणार आहेत.

या उपक्रमासाठी सवंगडी कट्टा सामाजिक समूहाच्या सदस्यांनी लोकसहभागातून निधी संकलित करून मोठ्या प्रमाणात औषधसाठा उपलब्ध केला आहे. पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या सर्व वारकऱ्यांनी या मोफत सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. गेल्या अकरा वर्षांपासून कोणत्याही अपेक्षेशिवाय वारकऱ्यांची सेवा करणाऱ्या 'सवंगडी कट्टा सामाजिक समूहा'च्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, समाजसेवेचा आदर्श नमुना म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.

**अचूक व त्रुटीमुक्त मतदारयादीसाठी सहकार्याचे आवाहन**

## मतदारयादी विशेष पुनरिक्षणासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा - शैलेश लाहोटी

**जिंतूर,/प्रतिनिधी-:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत जिंतूर तालुक्यातील हालवीरा येथे शनिवारी (दि. ५) जनजागृती सभा व प्रगणना फॉर्म वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी नागरिकांनी मतदारयादी अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना लाहोटी म्हणाले की, विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमादरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) प्रत्येक मतदाराच्या घरी भेट देऊन प्रगणना फॉर्मचे वितरण करणार आहेत. नागरिकांनी हा फॉर्म काळजीपूर्वक भरून त्यामधील माहितीची पडताळणी करावी. आवश्यक असल्यास मागविण्यात आलेली कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून द्यावीत तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करावे. मतदारयादीतील प्रत्येक नोंद अचूक असणे ही लोकशाही अधिक सक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी प्रत्येक नागरिकाने स्वतःपुरते मर्यादित न राहता आपल्या कुटुंबातील सदस्य, नातेवाईक, शेजारी आणि मित्रपरिवारालाही या अभियानाबाबत जागरूक करण्याचे आवाहन केले. मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, पत्रकार, राजकीय पक्षांचे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए), शासकीय अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी, पोलीस पाटील, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच गावपातळीवरील सर्व यंत्रणांनी पुढाकार घेऊन जनजागृती करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास मंडळ अधिकारी प्रशांत राखे, मंडळ अधिकारी कविता फाजगे, तलाठी वाकळे, धुळे, बुरकुल, गावचे सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थित नागरिकांना एसआयआर अभियानाचे महत्त्व, प्रगणना फॉर्म भरण्याची प्रक्रिया तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. गावातील नागरिकांनीही या अभियानाला सकारात्मक प्रतिसाद देत लोकशाही बळकट करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक जागरूक नागरिकाने पुढाकार घेणे आवश्यक असून, अचूक व पारदर्शक मतदारयादी तयार करण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# सक्षम व जबाबदार युवक घडविण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेणे आवश्यक - डॉ. महेश पालकर

**बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेत स्व. प्रा. वासंतीताई नावंदर जयंतीनिमित्त 'आत्मचिंतन दिन' संपन्न**

**परभणी,/प्रतिनिधी-:** : सक्षम व जबाबदार युवक घडविण्यासाठी तसेच आत्मनिर्भर आणि सुसंस्कृत भारताच्या निर्मितीसाठी शिक्षकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी केले.

परभणी शहरातील बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेच्या माजी उपाध्यक्षा स्व. प्रा. वासंतीताई नावंदर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'आत्मचिंतन दिन' कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार झरकर होते, तर प्रमुख व्याख्याते म्हणून प्राचार्य डॉ. दीनानाथ फुलवाडकर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. विवेक नावंदर, उपाध्यक्ष ॲड. विलासराव पोहंडूळकर, सहसचिव ॲड. संजय देशपांडे, शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, उपशिक्षणाधिकारी गोविंद मोरे, संस्थेचे सदस्य पवनकुमार झांजरी, एम. जी. विहिटकर, डॉ. अनिता विवेक नावंदर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. महेश पाटील, डॉ. हरिभाऊ पाटील, भगवान पाटील, मुख्याध्यापक संघाचे राजू शिंदे, मराठी गझलकार आत्माराम जाधव, मुख्याध्यापक अरुण बोराडे, उपमुख्याध्यापक रामदास तुम्मेवार, पर्यवेक्षक प्रदीप रूघे, बळीराम कोपरटकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुनीता जाधव, बाल विद्याविहारचे विभाग प्रमुख नितीन गोराडकर, बाल विद्या वर्धिनी इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक रमेश कापसे, बाल विद्या फाउंडेशनचे व्यवस्थापक सुनील घुगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना पालकर म्हणाले, शिक्षक हा समाज घडवणारा सर्वात महत्त्वाचा घटक असून राष्ट्रनिर्मितीत त्यांचे योगदान अनमोल आहे. उद्याचा सक्षम, सुसंस्कृत आणि जागृत नागरिक घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांविषयी असलेला विश्वास हा अनेकदा पालकांपेक्षाही अधिक दृढ असतो. शाळा-संस्था, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक हे शिक्षण व्यवस्थेचे चार आधारस्तंभ असून या चारही घटकांच्या प्रभावी समन्वयातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होतो. सक्षम व जबाबदार युवक घडविण्यासाठी तसेच आत्मनिर्भर आणि सुसंस्कृत भारताच्या निर्मितीसाठी शिक्षकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी सतत चिंतनशील राहणे आवश्यक आहे. ज्ञानाचे क्षेत्र वेगाने बदलत असताना अद्ययावत राहण्यासाठी आत्मचिंतन हा प्रभावी मार्ग आहे. स्वतःमधील उणिवांचे परीक्षण करून त्यामध्ये सुधारणा करणे, भविष्यासाठी योग्य नियोजन करणे आणि अध्यापन अधिक प्रभावी बनविणे यासाठी शिक्षकांनी नियमित आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेत दरवर्षी आयोजित केला जाणारा आत्मचिंतन दिन हा शिक्षकांच्या आत्मपरीक्षणाचा आणि गुणवत्ता वृद्धीचा आदर्श उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. नंदकुमार झरकर यांनी संस्थेचा गौरवशाली इतिहास हा संस्थाचालक, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या त्याग, समर्पण व निष्ठेचे फलित असल्याचे सांगितले. हा सुवर्ण इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शिक्षकांनी आत्मचिंतनाची परंपरा कायम ठेवत उत्कृष्टतेचा ध्यास घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संस्थेचे सचिव डॉ. विवेक नावंदर यांनी आत्मचिंतन दिनामागील उद्देश स्पष्ट करत संस्थेच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेतला. मागील दहा वर्षांपासून या उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षकांमध्ये नवचेतना, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. आधुनिक काळातील विविध शैक्षणिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आत्मचिंतन हे अत्यंत प्रभावी साधन असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात मान्यवरांचा परिचय समुपदेशक प्रवीण सोनोने आणि चंद्रकांत सिरसकर यांनी करून दिला. सूत्रसंचालन सुभाष ढगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापक रामदास तुम्मेवार यांनी केले. जयश्री महामुने यांनी पसायदान सादर करून कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

आत्मचिंतन व्यक्तिमत्त्व विकासाची गुरुकिल्ली... प्रमुख व्याख्याते प्राचार्य डॉ. दीनानाथ फुलवाडकर यांनी आत्मचिंतनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, आत्मचिंतन ही व्यक्तिमत्त्व विकासाची गुरुकिल्ली आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या कृती, विचार आणि ध्येयांचा नियमित आढावा घेतला तर यशाचा मार्ग अधिक सुलभ होतो. जग जिंकण्यापूर्वी स्वतःवर विश्वास असणे आवश्यक असून आत्मविश्वास ही यशाची पहिली पायरी आहे. ज्याचा स्वतःवर, विश्वावर आणि ईश्वरावर विश्वास असतो तोच खऱ्या अर्थाने आत्मविजयी ठरतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था आणि शिक्षक यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असून ध्येय, कर्तव्य आणि आत्मीयता या तीन मूल्यांवर संस्थेची प्रगती अवलंबून असते. या मूल्यांच्या बळावर बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेने दैदीप्यमान इतिहास घडविल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकी पेशा हा भाग्यवान व्यक्तींनाच लाभतो, असे नमूद करताना त्यांनी शिक्षक हे ईश्वराचे रूप असल्याचे सांगितले. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने आपले कार्य प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने करणे आवश्यक आहे. भौतिक आनंदापेक्षा आत्मिक समाधान अधिक महत्त्वाचे असून कोणतेही कार्य मनापासून केले तर त्यात यश निश्चित मिळते. शिक्षकांच्या प्रामाणिक प्रयत्नांतूनच आत्मनिर्भर भारताची उभारणी शक्य होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## अग्रलेख

# विद्या 'विनयेन' शोभते...

देश-विदेशातील समृद्धतेने नटलेल्या ज्ञानपरंपरेचा प्रामाणिक प्रसार व्हावा, सांस्कृतिक ठेवा म्हणून ज्यांची ओळख असते, त्या अमूल्य ग्रंथसंपदेचे जतन, संवर्धन व्हावे आणि 'सकल जनांसि' शहाणे करून सोडणाऱ्या वाचनसंस्कृतीचा वसा जपण्याच्या परंपरेच्या वारीमध्ये अधिकाधिक लोकांस सहभागी करून घ्यावे, या व्रतापासून काहीसे भरकटल्याची गेल्या काही वर्षांपासून मुंबईतील 'एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई' या नामांकित संस्थेच्या कारभाराबाबत व्यक्त होणारी खंत आता दूर झाली आहे. ज्ञानप्रसार, ज्ञानसंवर्धन, संपूर्ण समाजाचे सांस्कृतिक नेतृत्व, संशोधनातील उत्कृष्टता आणि सार्वजनिक बौद्धिक जीवनाच्या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याच्या ध्यासाचे नवे पर्व या संस्थेत सुरू होऊ घातले आहे. तब्बल सुमारे सव्वादोनशे वर्षांपूर्वी, एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी स्थापन झालेल्या, मुंबईचा मानबिंदू मानल्या जाणाऱ्या या संस्थेने ज्ञानप्रसाराची पालखी खांद्यावर वाहिली, पण पुढच्या वैचारिक वाटचालीत काळाच्या प्रत्येक पावलासोबत त्या पालखीतील नामवंतांच्या पाऊलखुणा मात्र काळवंडत गेल्या. 'एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई' या ऐतिहासिक संस्थेच्या कारभारावर चढलेली एकांगीपणाची, आर्थिक बेशिस्तीची पुटे आणि समाजापासून स्वतःस दूर राखून आपले वैचारिक वेगळेपण जपण्याच्या मूठभरांच्या मानसिकतेची जळमटे आता दूर होणार आहेत. गेल्या काही महिन्यांपासून वेगवेगळ्या माध्यमांचा आधार घेत आणि प्रसंगी न्यायालयाचे उंबरठे झिजवत संस्थेवरील मक्तेदारी शाबूत ठेवण्याचे हरतऱ्हेचे प्रयत्न करणाऱ्या काही ठरावीकांच्या कंपूने, ज्ञान ही एका विशिष्ट विचारसरणीची मक्तेदारी असल्याच्या आविर्भावात अन्य विचारसरणींच्या प्रवेशबंदीसाठी केलेल्या मोर्चेबांधणीचे कुंपण तोडून ही संस्था आता विचारस्वातंत्र्याच्या मुक्त पुरस्कारासाठी सिद्ध झाली आहे. 'एशियाटिक सोसायटी वाचवा' असा टाहो फोडत, आपली संस्थेवरील पकड टिकविण्याचे जिवापाड प्रयत्न करताना अन्य विचारसरणींना अक्षरशः अस्पृश्य ठरविणाऱ्या तथाकथित पुरोगामित्वाचा बुरखादेखील आता टराटरा फाटला आहे आणि येथील ज्ञानभांडार आता सहजपणे सर्वसामान्यांसाठी खुले होणार या जाणिवेने या समृद्ध संस्थेमधील ग्रंथसंपदा सुखावली आहे. संस्थेच्या कारभारावरील पकड सुटण्याच्या भीतीने वैचारिक अस्पृश्यतेचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पुरस्कार करणाऱ्या आणि संस्था उजव्या विचारसरणीच्या ताब्यात जाण्याची अनाकलनीय भीती समाजात रुजविण्याकरिता उपलब्ध सर्व प्रसारस्रोतांचा आधार घेणाऱ्या कथित पुरोगामी कंपूने संस्थेचे राजकीयीकरण होत असल्याचा कांगावा करीत संस्थेला वाचविण्याचा घेतलेला पवित्रा किती बेगडी होता, हे निवडणुकांच्या काळातील न्यायालयीन लढ्यात वेळोवेळी उघड होत गेले होते. आपले वैचारिक वर्चस्व टिकविण्यासाठी आणि एकाच विचाराची पालखी मिरविण्याच्या अट्टहासापोटी गेल्या काही महिन्यांत एशियाटिक सोसायटीच्या निवडणुकीच्या निमित्ताने जे काही घडले, त्यामुळे मुंबईचेच नव्हे, तर महाराष्ट्राचे बौद्धिक वातावरण पुरते गढुळले होते.


वाचनसंस्कृतीचा प्रामाणिक प्रसार करावयाचा असेल, समृद्ध ज्ञानपरंपरेचा वारसा प्रत्येक पिढीपर्यंत पोहोचवायचा असेल, तर या व्रतापासून वंचित राहिल्यामुळे दूर असलेल्या अनेकांस सोबत घ्यावे लागते. एशियाटिक सोसायटी नावाच्या या संस्थेस मात्र, हा समृद्ध वारसा लोकांपर्यंत पोहोचूच नये अशा अलिप्त मानसिकतेचा विळखा वर्षानुवर्षे पडून राहिल्याने, असंख्य ज्ञानपिपासूंना संस्थेचा उंबरठादेखील ओलांडताच येत नव्हता, असा आरोप केला जातो. कदाचित त्यामुळेच, संस्थेच्या सदस्यांची संख्या एका गोतावळ्यापलीकडे पोहोचणारच नाही याची खबरदारी घेण्याची प्रथा रुजली आणि कालपरवापर्यंत या प्रथेचे पालन करणाऱ्या पाईकांनी संस्थेच्या कारभारात अनेक बेकायदा कृत्यांचा आधार घेतल्याचेही अनेकदा उघडकीस आले. 'एशियाटिक बचाव' हा या निवडणुकीच्या निमित्ताने दिला गेलेला अशा काही पाईकांचा नारा होता, पण प्रत्यक्षात मात्र, एशियाटिकमधील अस्तित्व वाचविण्याची ती धडपड होती, असेही वेगवेगळ्या वेळी उघड होत गेले. अखेर या एकांगी मक्तेदारीच्या हट्टापायीच एशियाटिक सोसायटी नावाच्या या संस्थेला आपल्या उद्याच्या मुक्त अस्तित्वभयाची जाणीव झाली असावी. त्यामुळेच, कालपरवापर्यंतची 'कब्जा राखण्याची' धडपड आता इतिहासजमा झाली असून 'एशियाटिक टुमॉरो' नावाच्या गटाच्या झेंड्याखाली एकत्र आलेल्या तळमळीच्या कार्यकर्त्यांनी या संस्थेची मुक्तता केली आहे. कोणत्याही समाजाचे बौद्धिक सामर्थ्य मोजायचे असेल, तर त्या समाजातील ग्रंथालये, ग्रंथसंग्रह आणि वाचनसंस्कृती याकडे पाहावे लागते. ग्रंथालय म्हणजे केवळ इमारत नसून समाजाच्या सभ्यतेचे चिन्ह असते. म्हणूनच ग्रंथांचे जतन ही केवळ सांस्कृतिक जबाबदारी नाही, तर भावी पिढ्यांना वैचारिकदृष्ट्या सुसंस्कृत व समृद्ध करण्याकरिता असलेली ऐतिहासिक आणि नैतिक बांधिलकी असते. केवळ नवीन पुस्तके प्रकाशित करून ही बांधिलकी पूर्ण होत नाही, तर दुर्मिळ ग्रंथांचे वैज्ञानिक संवर्धन, हस्तलिखितांचे डिजिटायझेशन, सार्वजनिक ग्रंथालयांचे आधुनिकीकरण ही आजच्या काळाची मुख्य गरज आहे. कारण ग्रंथालये ही केवळ पुस्तकांची गोदामे नाहीत. ती समाजाच्या बौद्धिक आरोग्याची केंद्रे आहेत. म्हणूनच, एशियाटिक सोसायटीला पुन्हा एकदा समाजाभिमुख करण्याची आणि सांस्कृतिक संपन्नतेचे चिन्ह असलेल्या या संस्थेच्या समृद्धीच्या सहवासाकरिता आतुरलेल्या सर्वांकरिता या संस्थेचे दरवाजे मुक्तपणे खुले करण्याची गरज होती. 'एशियाटिक टुमॉरो' नावाच्या गटातील कार्यकर्त्यांनी ही गरज नेमकी ओळखली आणि त्यासाठी जिवापाड मेहनत घेतली. संस्थेच्या भविष्याचा एका सुनियोजित आराखडा तयार केला, मतदारांसमोर प्रामाणिकपणे मांडला आणि संस्थेच्या सावलीत फोफावलेल्या वैचारिक अस्पृश्यतेला तिलांजली देण्याची ग्वाही देत हे कार्यकर्ते सज्ज झाले. विद्या आणि ज्ञान हे आढ्यताखोरांच्या अंमलाखाली राहिले, तर समाजापासून फटकून राहते, असे म्हणतात. पण ते समाजाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले, तर त्याची शोभा अधिक वाढते ही संस्कृतीची शिकवण आहे. म्हणूनच, 'विद्या विनयेन शोभते' असा सुंदर सुविचार संस्कृतात रूढ आहे. 'एशियाटिक'मधील परिवर्तनाची प्रक्रिया सुरू असताना याचा प्रत्यय ज्यांना आला, त्या मतदारांनी परिवर्तनाच्या बाजूने कौल दिला आहे, असा एशियाटिक सोसायटीच्या भविष्याच्या वाटचालीचा अर्थ आहे.

आज आपण आर्थिक विकास, तांत्रिक प्रगती आणि जागतिक स्पर्धेबद्दल बोलतो; पण या सर्वांचा पाया ज्ञान आहे. ज्ञानाचा पाया वाचन आहे आणि वाचनाचा पाया ग्रंथ आहेत. त्यामुळे ग्रंथांचे संरक्षण, ग्रंथालयांचे संवर्धन आणि वाचनसंस्कृतीचा प्रसार हे कोणत्याही राष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणाचे केंद्रबिंदू असले पाहिजेत. राजकीय पक्षांच्या प्रभावापासून अलिप्त राहून संस्थेच्या सर्वांगीण परिवर्तनाची ग्वाही देत संस्थेचा कार्यभार नव्याने हाती घेणाऱ्या या कार्यकर्त्यांसमोर हे एक आव्हान आहे. कारण त्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती आणि अंमलबजावणीसाठी शक्य ते सारे पणाला लावण्याची तयारी गरजेची आहे. संस्थेची सुंदर इमारत आणि त्या इमारतीच्या दरवाजापर्यंत घेऊन जाणारी प्रत्येक पायरी म्हणजे केवळ सेल्फी पॉईंट किंवा चित्रपट-मालिकांमधील प्रेमप्रसंगांच्या पृष्ठभूमीचा देखावा नव्हेत, तर ज्ञानप्राप्तीच्या प्रकाशवाटा आहेत. त्या अधिक उजळाव्यात आणि संस्थेचे पावित्र्य अधिक तेजस्वीपणे समाजाला दिशा देत रहावे, याकरिता कार्यबद्ध राहण्यासाठी नव्या चमूस शुभेच्छा! ■

## प्रासंगिक

**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

# भारताची एकता आणि प्रगतीसाठी समर्पित जीवन



आज सहा जुलै, राष्ट्रवाद आणि निःस्वार्थ सेवेचा आदर्श मानणाऱ्या, त्यांची जपणूक करणाऱ्या सर्व लोकांसाठी आजचा दिवस विशेष आहे. आज डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची १२५ वी जयंती आहे. भारत मातेच्या सेवेप्रति कटिबद्धता आणि धैर्य यांचे ते कालातीत मूर्तिमंत उदाहरण आहेत. आधुनिक भारताच्या इतिहासात, असे अगदी कमी लोक आहेत, ज्यांच्यात बुद्धिमत्ता, सार्वजनिक सेवाभाव आणि नैतिक दृढनिश्चय यांचा संगम आढळतो, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी त्यांच्यापैकीच एक आहेत.

श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा जन्म अशा परिस्थितीत झाला होता, जिथे, त्यांना सहज एक आरामदायी आणि सुरक्षित आयुष्य मिळू शकले असते. त्यांचे पिता, सर आशुतोष मुखर्जी, त्या काळातील एक आघाडीचे शिक्षणतज्ज्ञ आणि प्रखर बुद्धिवादी होते. नियतीने त्यांना, एक अत्यंत उच्चभ्रू, सुखासीन आयुष्य दिले असले, तरी त्यांच्यातील विवेकाने, त्यांना देशसेवा आणि त्यागाचा मार्ग दाखवला. त्या काळातील अत्यंत अस्थिर परिस्थितीत आपण केवळ बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही, असा कौल त्यांच्या मनाने त्यांना दिला. मग ती वसाहतवादी शक्तींशी लढाई असो, जातिवाद, धर्मभेद किंवा मग मानवतेसमोरची आव्हाने असोत, अथवा इतर काही. त्यांच्या या प्रवासात त्यांना वैयक्तिक आयुष्यात अनेक संकटे, दुःखाचा सामना करावा लागला, यात अगदी त्यांचं बाळ आणि नंतर त्यांच्या पत्नीचे झालेले देहावसान, अशा अपार दुःखाच्या प्रसंगांचा त्यांना सामना करावा लागला. मात्र अशा सगळ्या दुःखांनी, त्यांचा दृढनिश्चय अधिक वाढवला आणि देशाची सेवा करण्याची कटिबद्धता अधिक दृढ केली.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या सार्वजनिक जीवनातील एक आदर्श, जो या सगळ्या गुणांच्या वर होता, असे सांगायचे झाले, तर तो आदर्श गुण ठरेल, अखंड भारताप्रति त्यांची निष्ठा! फाळणीच्या गदारोळात, हिंसाचारातही, पश्चिम बंगाल हा भारताचा अविभाज्य घटक राहील, यासाठी ते पाय घट्ट रोवून उभे राहिले. काही वर्षांनी, त्यांच्या याच अखंडतेच्या ध्यासाने, ते जम्मू आणि काश्मीरला गेले. तिथे झालेला तुरुंगवासही त्यांना त्यांच्या ध्येयापासून परावृत्त करू शकला नाही. मात्र, याच तुरुंगवासात त्यांचा अकाली मृत्यू झाला. तुरुंगावासात, अशा ठिकाणी... एकटेपणात... ज्या लाखो लोकांचं आयुष्य त्यांनी स्वतःचे आयुष्य बनवले होते, अशा सगळ्या मोलाच्या माणसांपासून दूर. इतिहासात असे काही क्षण येतात, जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या सर्वोच्च बलिदानामुळे ती व्यक्ती राजकारणाच्या पलीकडे जाते आणि त्यांचे कर्तव्य, एका राष्ट्रीय स्मृती ठरतात. आचार्य विनोबा भावे एकदा असे म्हणाले होते की, ज्या तत्त्वावर श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा दृढविश्वास होता, त्यासाठी त्यांनी आपल्या स्वतःचे बलिदान दिले. या घटनेनंतर अनेक वर्षांनी, कलम ३७० आणि अनुच्छेद ३५ (अ) हटवणे (२०१९ चा कायदा), ही त्यांच्या बलिदानाला दिलेली सर्वोच्च मानवंदना होती.

डॉ. मुखर्जी यांनी, कायमच भारताला आणि भारतीय मूल्यांना अग्रस्थानी ठेवले. त्यासाठी त्यांनी त्या काळातील प्रचलित विचारसरणींना छेद देणाऱ्या संस्था उभारून आणि सक्षम व्यवस्था घडवून हे सिद्ध केले. ते कलकत्ता विद्यापीठाचे सर्वांत तरुण कुलगुरू बनले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैलीद्वारे त्यांनी देशभक्तीची प्रेरणा देणारे आणि भविष्याची दृष्टी असलेले सकारात्मक बदल घडवून आणले. शिक्षणतज्ज्ञांच्या एका परिषदेला संबोधित करताना डॉ. मुखर्जी यांनी अतिशय समर्पक शब्दांत म्हटले होते की, शैक्षणिक संस्थांकडे संभाव्य कारकून आणि अल्प वेतनावर काम करणारे कर्मचारी तयार करणारे कारखाने म्हणून पाहणे चुकीचे आहे. नगरपालिका, प्रांतीय आणि केंद्रीय विधिमंडळे यांसारख्या आपल्या स्वशासित संस्थांना नेतृत्व देण्यास सक्षम असलेले, तसेच वित्तीय, व्यापारी आणि औद्योगिक अशा जीवनाच्या विविध क्षेत्रांतील कामकाजाचे संचालन करू शकणारे विद्यार्थी घडविणे आवश्यक आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली कलकत्ता विद्यापीठाने ग्रंथालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, विज्ञान विषयातील संशोधनाला चालना देणे, पुरावस्तूंच्या अध्ययनाला प्रोत्साहन देणे तसेच कृषी विषयातील अभ्यासक्रम सुरू करणे, अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी केली. त्यांनी क्रीडा, शिक्षक प्रशिक्षण आणि विद्यार्थी कल्याण यांसारख्या क्षेत्रांकडेही विशेष लक्ष वेधले. विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठाबद्दल अभिमानाची भावना निर्माण व्हावी, यासाठी त्यांनी २४ जानेवारी हा दिवस विद्यापीठाचा स्थापना दिन म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू केली. विद्यापीठासाठी गीत रचण्याची विनंती त्यांनी थेट गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनाच केली होती.

त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी भारतीय जनसंघाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला, त्यातूनही हीच भावना दिसून येते. त्या काळात काँग्रेस पक्षाचे सगळीकडे वर्चस्व असताना, भारताच्या प्रगतीसाठी आपल्या सांस्कृतिक मुळांशी जोडलेले राहून पर्यायी आवाज उभा राहणे अधिक आवश्यक असल्याचे त्यांना वाटत होते. कदाचित म्हणूनच त्या पक्षाचे निवडणूक चिन्ह मातीचा दिवा होते. एक दिवा दिसायला साधा वाटू शकतो; मात्र स्वतःच्या मर्यादेपेक्षा कितीतरी अधिक अंधार दूर करण्याची क्षमता त्याच्यामध्ये असते. जनसंघाने आपल्या कार्यरत असलेल्या काळात आणि त्यानंतरही नेमके हेच कार्य केले.

भारताचे पहिले उद्योग आणि पुरवठा मंत्री म्हणून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा कार्यकाळ हा विकासाविषयी अत्यंत व्यापक आणि मानवतावादी दृष्टिकोन असलेल्या एका नेत्याचे दर्शन घडवतो. नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्राचा सन्मान, संधी आणि आत्मविश्वास पुनर्स्थापित करण्याचे साधन म्हणून त्यांनी उद्योगांकडे पाहिले. संपत्तीची निर्मिती आणि मूल्यवर्धन यांचा त्यांनी आदर केला. दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन, सिंद्री खत प्रकल्प आणि भक्कम औद्योगिक धोरण यासारख्या अग्रणी उपक्रमांद्वारे आधुनिक औद्योगिक भारताचा पाया रचत असतानाच, भारताच्या पारंपरिक सामर्थ्याकडे दुर्लक्ष होणार नाही, याचीही त्यांनी खात्री केली. हातमाग, कुटीर उद्योग, कारागीर आणि वस्त्रोद्योगातील कामगार यांनाही त्यांच्यामध्ये तितकाच कटिबद्ध पुरस्कर्ता लाभला.

या ठिकाणी मला एक वैयक्तिक अनुभव सांगायचा आहे. आत्मनिर्भरतेच्या स्पष्ट दृष्टिकोनातून डॉ. मुखर्जी यांनी प्रयत्नपूर्वक उभारलेल्या सिंद्री खत प्रकल्पाकडे अनेक दशके देशाचे नेतृत्व करणाऱ्यांनी दुर्लक्ष केले. मला याचा अभिमान वाटतो की, आमच्या सरकारला या परंपरेच्या पुनरुज्जीवनात योगदान देण्याची संधी मिळाली. त्या कार्यक्रमात उपस्थित राहणे हा खरोखरच सर्वांत विशेष क्षणांपैकी एक होता.

भारताच्या सांस्कृतिक परंपरेने फार पूर्वीपासून संवाद आणि चर्चांना महत्त्व दिले आहे. डॉ. मुखर्जी यांनी याच लोकशाही मूल्यांचे प्रतिनिधित्व केले होते. सुरुवातीच्या काळात राष्ट्र उभारणीचे कार्य राजकीय मतभेदांच्या पलीकडचे आहे, असा विश्वास बाळगून ते पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात सामील झाले. त्यांनी प्रामाणिकपणे आणि विधायक भावनेने काम केले; परंतु जेव्हा त्यांना वाटले की राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांसाठी वेगळ्या मार्गाची आवश्यकता आहे, तेव्हा त्यांनी सन्मानाने पदाचा त्याग केला आणि राष्ट्राला आवश्यक असलेल्या राजकीय कार्यासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले.

७५ वर्षांपूर्वी, पंडित नेहरूंनी पहिले घटनादुरुस्ती विधेयक आणले, जे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर थेट आघात करणारे होते. डॉ. मुखर्जी हे त्याच्या सर्वांत कट्टर विरोधकांपैकी एक होते. काँग्रेस काय करू शकते, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. आणि पुढील घडामोडींनी त्यांची भूमिका योग्य असल्याचे सिद्ध केले. ज्यांनी ७५ वर्षांपूर्वी पहिले घटनादुरुस्ती विधेयक आणले, त्यांनीच १९७५ मध्ये आणिबाणी लादली आणि त्यानंतर ५० वर्षांपूर्वी ४२वी घटनादुरुस्ती करून उदारमतवादी लोकशाही मूल्यांच्या मुळावरच घाव घातला.

डॉ. मुखर्जी मानवतावादी कार्यासाठीही ओळखले जातात. १९४३ मध्ये जेव्हा बंगालमध्ये भीषण दुष्काळ पडला, तेव्हा डॉ. मुखर्जींनी स्वतःला पीडितांच्या सेवेत झोकून दिले. लोकांना अन्न मिळावे, यासाठी त्यांनी अनेक उपाहारगृहे आणि मदत केंद्रे उघडली जातील याची खात्री केली. एकीकडे ते आपल्या लोकांच्या दुर्दशेने अत्यंत व्यथित झाले होते, तर दुसरीकडे वसाहतवादी शासकांच्या असंवेदनशीलतेमुळे ते दुःखी झाले होते. त्यांनी 'पंचशेर मनवंतर' नावाचे एक पुस्तकही लिहिले, ज्यात त्यांनी आपली व्यथा मांडली. १९४२ मध्ये जेव्हा मेदिनीपूरला महाचक्रीवादळाचा तडाखा बसला, तेव्हा परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची सर्वत्र प्रशंसा झाली.

कोलकाता येथील एका महाविद्यालयात बोलताना डॉ. मुखर्जी यांनी तरुणांना आवाहन केले, "तुम्ही जे काही काम हाती घ्याल, ते गांभीर्याने, सखोलपणे आणि उत्तमरीत्या करा; ते कधीही अर्धवट किंवा अपूर्ण सोडू नका आणि जोपर्यंत तुम्ही तुमचे सर्वोत्तम योगदान देत नाही, तोपर्यंत समाधानी राहू नका."

भारत देश 'विकसित भारता'च्या ध्येयाकडे वाटचाल करत असताना, त्यांनी ज्या मजबूत, एकसंध, आत्मविश्वासी आणि करुणामय भारतावर दृढविश्वास ठेवला होता, तो घडवण्यासाठी दररोज प्रयत्न करणे, हीच त्यांच्या स्मृतीला वाहिलेली सर्वोत्तम आदरांजली आहे. आजच्या तरुण पिढीवर माझा पूर्ण विश्वास आहे की ते या आवाहनाला समर्थन देतील. ■

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# आता 'भीती' शिकवावी का?

घराघरातून नव्या पिढीवर चांगले संस्कार व्हावेत, नवी पिढी अधिक चारित्र्यवान, सुशिक्षित आणि धाडसी प्रवृत्तीची घडावी, अशी सार्थ अपेक्षा प्रत्येकालाच असते. यापैकी पहिल्या तीन गुणांचे संवर्धन पालक आणि शिक्षक मिळून करतातच. पण, चौथा गुण अर्थात धाडस हा बहुतांश वेळी अंगभूत असतो. अर्थात, काही मुले-मुली परिस्थितीनुरूप धाडसी किंवा भित्रे बनतात. पण, आज आपल्या अपत्यांना मग मुलगा असो वा मुलगी, त्यांना धाडसी बना, हे सांगायचे की नाही, असा प्रश्न पालकांकडून केला जातोय.

मुंबईच्या लोकलमध्ये एका तरुणाने दुसऱ्याचा धक्का लागला म्हणून त्याला हटकले तर त्याने त्या तरुणाचा खूनच केला. राजस्थानात एक १३ वर्षीय मुलगी ऑटोने मैत्रिणीकडे जात असताना ऑटोवाल्याने तिला थेट एका हॉटेलमध्ये नेले आणि तिथे तिला विकले. त्या ठिकाणी पाच दिवस ३० जणांनी तिच्यावर अत्याचार केले. तिची कशीबशी सुटका झाली. पण, या निमित्ताने प्रश्न उपस्थित झाला की, आपल्या मुलांना आपण धीटपणे वागायला शिकवायचे की नाही? आता समाज माध्यमांवरही अशा आशयाच्या रील्स येताहेत की, आपल्या मुलांना सांगा, कोणाशीही क्षुल्लक किंवा अन्य कोणत्याही कारणाने भिडण्यात काही अर्थ नाही. कारण कोण व्यक्ती कोणते शस्त्र बाळगून असेल, कोणत्या मानसिकतेत असेल, शुद्धीवर असेल किंवा नसेल, याचा नेम नाही. आपली चूक नसेल तरीही 'सॉरी' हा परवलीचा शब्द बोलून दोन पावलं मागे यावे. हा भित्रेपणा आहे का? तर नक्कीच नाही. हा आजच्या काळात शहाणपणा ठरतोय. कारण यातून किमान पुढील अनर्थ टळू शकतो. सार्वजनिक ठिकाणी वावरणाऱ्या बहुतांश लोकांमध्ये प्रचंड उद्दामपणा दिसतो. कोणालाच झुकायचे नाही, माघार घ्यायची नाही. आपली चूक तर कबूल करायचीच नाही. अशात जर कोणी 'अरे'ला 'कारे' केले तर गहजबच होतो. परिणाम काय घडेल, याचा आपल्याला रोजच्या बातम्यांमधून अंदाज बांधता येईल. पण, मग यावर प्रत्येकवेळी आपली चूक नसताना माघार घेणे, समोरच्याची चूक असूनही आपण बॅकफूटवर येणे, हाच मार्ग चोखाळायचा का? उत्तर कठीण आहे. मुळात, असे कोणतेही चित्र उभे राहूच नये, अशी सामाजिक स्थिती निर्माण होणे गरजेचे आहे. प्रत्येकाने नागरी कर्तव्य म्हणून सर्व नियम पाळले, एकमेकांशी सौहार्द ठेवला तर अशा संघर्षाची वेळच येणार नाही. मग यासाठी सर्वांत आधी गरजेची आहे कायदा, सुव्यवस्था. मानसोपचारतज्ज्ञांच्या मते, जगात सुमारे पाच हजार प्रकारच्या वेगवेगळ्या भीती माणसाला असू शकतात. मरणाची भीती हा मानवी स्वभाव आहे. याही पुढे जात आता माणसामध्ये कायद्याची भीती निर्माण व्हायला हवी. आखातातील काही संपन्न देश असे आहेत जिथे महिलांविषयीच्या गुन्ह्यांसंदर्भातील कायदे अतिशय कठोर आहेत. अशा ठिकाणी गुन्ह्यांचे प्रमाण साहजिकच कमी आहे. कारण तेथील लोकांना कायद्याची भीती वाटते. आपल्या देशात कायद्याची भीतीच उरलेली नाही, असे खेदपूर्वक नमूद करावेसे वाटते. कायदा हा लोकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी नक्कीच नाही. पण, कायदा मोडला तर शासन होईल, हा विश्वास सर्वसामान्यांमध्ये निर्माण व्हायला हवा. कायद्याची सार्थकता यातच आहे की, त्याचा वापर कमी वेळा व्हावा. भीती गुन्हेगारांच्या मनात बसायला हवी. ही जबाबदारी अर्थातच प्रशासकीय व्यवस्थेची आहे.

भीती ही एक नैसर्गिक आणि प्राथमिक भावना आहे, जी धोक्यापासून बचाव करण्यासाठी देह आणि बुद्धीला सतर्क करते. भीतीची भावना जास्त काळ राहिली तर ती माणसाला दुबळे बनवते. आपल्याला नवीन पिढीमध्ये देह आणि बुद्धीला सतर्क करणारी भीती निर्माण करायची आहे, दुबळी करणारी नाही. एक छोटीशी गोष्ट आहे. एकदा यमाने आपल्या दूतांना रागावले की, तुम्हाला मी ५०० माणसांना घेऊन यायला सांगितले तर मग तुम्ही हजार माणसे का आणली? त्यावर दूत म्हणाले, आम्ही ५०० लोकांचेच प्राण घेतले. पण, उर्वरित ५०० नुसत्या भीतीनेच मेले. म्हणून आपल्या मुलांना शिकवायची तर वाईटाची भीती शिकवावी. अनाठायी धाडस नको आणि अवाजवी भीतीही नको, हा धडा नवीन पिढीसाठी त्यातल्या त्यात योग्य ठरेल. ■

७७५५९३८८२२

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# अण्वस्त्र : ब्रह्मास्त्र की पांढरा हत्ती?



भारताने आपल्या भात्यातील १९० अण्वस्त्रांपैकी १२ अण्वस्त्रे 'तैनात' केली असल्याचे वृत्त समोर आले आहे. लवकरच पाकिस्तानही असाच निर्णय घेईल असे मानले जाते. कारण, १९९८ मध्ये भारताने अणुविस्फोट केल्यानंतर काही आठवड्यांत पाकिस्ताननेही अणुविस्फोट करीत आण्विक शक्तीच्या विश्वात पदार्पण केले होते.

भारताने १२ अण्वस्त्रे तैनात केल्याचे जे वृत्त समोर आले आहे ते काही भारत सरकार वा सरंक्षण मंत्रालयाने अधिकृतपणे दिलेले नाही. स्वीडनची राजधानी स्टॉकहोममध्ये असलेल्या स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटने आपल्या वार्षिक अहवालात ही माहिती दिली आहे. भारताजवळ १८० अण्वस्त्रे होती, आता त्यांची संख्या १९० झाली आहे आणि त्यातील १२ आता काही पाणबुड्यांमध्ये तैनात करण्यात आली आहेत असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. अण्वस्त्रांच्या बाबतीत सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे ती आदेश दिला की लगेच वापरता येतील अशी ठेवलेली नसतात. त्याचे काही भाग जोडावे लागतात आणि नंतर त्याचा वापर केला जातो. बटन दाबले की अण्वस्त्र सोडले जाते हा एक केवळ गैरसमज.

**अण्वस्त्रे आता बोथट?** : अण्वस्त्रे ही शत्रूला घाबरविण्यासाठी असतात, जरब बसविण्यासाठी असतात. त्याचा वापर केला जात नसतो असे मानले जाते. पण, याचा फायदा युद्ध टाळण्यासाठी होतो असेही मानले जाते. भारत-पाकिस्तान दोघेही अण्वस्त्रधारी झाल्याने आता दोघांमध्ये परंपरागत शस्त्रांनी युद्ध होणार नाही असे याच आधारावर सांगितले गेले. पण, झाले मात्र उलटेच. भारत-पाकिस्तान दोन्ही देशांनी १९९८ मध्ये अण्वस्त्रे तयार केलीत आणि १९९९ मध्ये दोन्ही देशांत कारगिल युद्ध झडले. ते चांगले दोन महिने चालले. पण, त्यात एकदाही अण्वस्त्रांचा वापर करण्याची धमकी ना भारताने दिली ना पाकिस्तानने.

वर्षभरापूर्वी दोन्ही देशांत पुन्हा चार की पाच दिवसांचा एक मर्यादित संघर्ष झडला. १९९९ व २०२५ या दोन्ही युद्धात फक्त पारंपरिक शस्त्रांचाच वापर करण्यात आला. अण्वस्त्रांचा नाही. त्यामुळे दोन्ही देश अण्वस्त्रसंपन्न झाल्याने आण्विक संघर्ष होण्याच्या शक्यतेने वा भीतीने आता त्यांच्यात युद्ध होणार नाही हा समज की सिद्धांत या दोन्ही युद्धांनी खोटा ठरविला. म्हणजे अण्वस्त्रे एकप्रकारे बोथट झाली आहेत.

**वेगवेगळे धोरण** : भारताने आपल्या अण्वस्त्रांबाबत 'नो फर्स्ट युज' म्हणजे भारत प्रथम अण्वस्त्र वापरणार नाही असे वारंवार म्हटले आहे तर याउलट पाकिस्तानने असे काहीही म्हटलेले नाही. त्याने 'फुल स्पेक्ट्रम युज' हे धोरण स्वीकारले आहे. म्हणजे आपल्या आण्विक भात्यातील कोणतेही शस्त्र केव्हाही वापरण्याचा पर्याय त्याने खुला ठेवला आहे. भारतीय सैन्यासमोर आपण टिकाव धरू शकत नाही याची कल्पना पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांना असल्याने त्यांनी नो फर्स्ट युजचे धोरण स्वीकारले नाही. त्याचप्रमाणे पाकिस्तानचे भौगोलिक आकारमान भारताच्या तुलनेत कमी असल्याने सारा पाकिस्तान भारताच्या हवाई माऱ्याच्या पट्ट्यात येऊ शकतो. ती स्थिती येण्यापूर्वीच पाकिस्तानने अण्वस्त्रे वापरली पाहिजेत या विचारातून त्याने 'फुल स्पेक्ट्रम युज' हा आण्विक सिद्धांत स्वीकारला आहे.

**सर्वाधिक साठा रशियाकडे** : जगात सर्वाधिक अण्वस्त्रांचा साठा रशियाकडे आहे. पण, चार वर्षांपासून सुरू असेलल्या युक्रेन विरुद्धच्या युद्धात रशियाने एकही अण्वस्त्र वापरलेले नाही. राष्ट्रपती पुतिन यांनी प्रारंभीच्या काळात अण्वस्त्रे वापरण्याची धमकी तर दिली पण ते वापरण्याचे साहस ते दाखवू शकते नाहीत. कारण, अण्वस्त्र एवढे संहारक शस्त्र आहे की ते वापरण्याची ताकद कोणत्याही देशाजवळ नाही. फक्त इस्रायल-इराणसारखे देशच त्याचा वापर करू शकतात. इस्रायलजवळही अण्वस्त्रे असल्याचे मानले जाते. पण, त्यानेही गाझा पट्टी, लेबनॉन, इराण यांच्याविरोधात अण्वस्त्र वापरण्याचे धाडस केलेले नाही.

**तरीही पीछेहाट** : युक्रेन युद्धात समोर आलेल्या ताज्या माहितीनुसार, मागील दोन महिन्यांपासून रशियाची पीछेहाट सुरू आहे. रशियाजवळ तर अण्वस्त्रांचा साठा आहे. युक्रेनजवळ एकही अण्वस्त्र नाही तरीही रशियाची पीछेहाट होत आहे. याचे कारण म्हणजे रशियाजवळ असलेली अण्वस्त्रे एवढी विध्वंसक आहेत की तो त्याचा वापर करण्याचा विचारही करू शकत नाही आणि दुसरीकडे युक्रेनने ड्रोन नावाचे असे नवे शस्त्र तयार केले आहे की त्याने येणाऱ्या काळातील युद्धांचा संदर्भ बदलून टाकला आहे. आणि याच ड्रोनच्या ताकदीवर युक्रेनने रशियाला पीछेहाट करण्यास बाध्य केले आहे.

**ऑपरेशन स्पायडर वेब** : युक्रेनने मागील वर्षी ऑपरेशन स्पायडर वेब नावाने एक हवाई हल्ला करीत रशियाला या युद्धातील सर्वांत मोठा दणका दिला आहे. १ जून २०२५ मध्ये ११७ ड्रोनचा वापर करीत युक्रेनने रशियाच्या खोल आतवर घुसून त्याच्या हवाई तळांवर हल्ले केले. यातील बेलाया हवाई तळ तर युक्रेन-रशिया सीमेपासून ४३०० किलोमीटर होता. म्हणजे ड्रोनच्या साहाय्याने युक्रेनने काय केले याचा हा दाखला होता आणि याउलट जगातील सर्वाधिक अण्वस्त्रे असणारा रशिया काहीही करू शकला नाही.

**मास्कोवर काळोख** : रशियाने युक्रेनवर काही भीषण हल्ले चढविल्यानंतर युक्रेनने थेट मास्कोवर हल्ला करण्यापर्यंतची मजल मारली. मास्कोजवळ असलेल्या तेल शुद्धीकरण कारखान्यांवर ड्रोनने हल्ला चढविण्यात आला आणि युद्ध म्हणजे काय याची कल्पना मास्कोच्या रहिवाशांना आली. साऱ्या मास्कोवर काळोख दाटला होता. सर्वत्र अंधाराचे साम्राज्य. म्हणजे आता युक्रेनने फक्त क्रेमलिनवरच हल्ला करण्याचे बाकी ठेवले आहे. युक्रेनपासून थेट मास्कोपर्यंत जाऊ शकतील असे अत्याधुनिक ड्रोन तयार करण्यात युक्रेनने यश मिळविले आहे.

**नवी महाशक्ती?** : अमेरिकेचे पॅट्रिएट प्रक्षेपणास्त्र जे काम करते, तेच काम युक्रेनचे वाईल्ड हॉर्नेट हे ड्रोन करते. एका पॅट्रिएट प्रक्षेपणाची किंमत जवळपास ३० कोटी रुपये आहे तर वाईल्ड हॉर्नेटसाठी फक्त अडीच लाख रुपये मोजावे लागतात. युक्रेनने ड्रोन तयार करण्याचा जणू सपाटा लावला असून आज ड्रोन तयार करण्याची त्याची वार्षिक क्षमता ५० लाख एवढी झाली आहे. आणि ही संख्या चीन-रशिया यांच्या एकत्रित क्षमतेपेक्षा जास्त आहे. चीन दरवर्षी २० लाख ड्रोन तयार करू शकतो तर रशिया १८ लाख. २०२६ या चालू वर्षात ८० लाख ड्रोन तयार करण्याचे लक्ष्य युक्रेनने ठरविले आहे. यासाठी त्याला आर्थिक साहाय्य करण्यासाठी १६ देशांचा एक गट स्थापन करण्यात आला असून त्यात कॅनडा व ब्रिटन हे प्रमुख भागीदार आहेत. आता तर युक्रेनने ड्रोनची निर्यात करणे सुरू केले आहे. यावरून युक्रेनने ड्रोन उत्पादनात किती मोठी मजल गाठली आहे याची कल्पना करता येईल.

**रशियापेक्षा श्रेष्ठ** : २०२५ मध्ये रशियाने युक्रेनच्या विरोधात ५४ हजार ड्रोन वापरले. 'शाहीद' नावाचे हे ड्रोन इराणने रशियाला पुरविले होते. त्यापेक्षा युक्रेनचे ड्रोन अधिक प्रभावी ठरत आहेत आणि ते जगाला दिसत आहेत. युक्रेनने ड्रोनमध्ये वेगवेगळे प्रकार तयार केले आहेत. त्यात फर्स्ट पर्सन व्ह्यू एफपीव्ही हा सर्वांत सोपा व सैनिकांमध्ये प्रिय ठरला आहे. कारण तो वापरणे सर्वांत सोपे असते.

**ड्रोनयुग?** : अण्वस्त्र तयार करणे हेच एक मोठे काम असते. नंतर त्या अण्वस्त्रांची सुरक्षा, देखभाल, ते वापरण्याची गुंतागुंतीची प्रक्रिया आणि शेवटी ते वापरले जाण्याची शून्य शक्यता हे सारे पाहता अण्वस्त्रे आता पांढरा हत्ती ठरत आहेत काय?

युक्रेन आता ड्रोन 'सुपर पॉवर' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. मग, जगातील सर्वाधिक अण्वस्त्रे असणाऱ्या रशियाचे काय? ड्रोनधारी युक्रेनसमोर अण्वस्त्रधारी रशियाला का नांगी टाकावी लागत आहे? अण्वस्त्रांचे युग संपून आता ड्रोनयुग सुरू झाले असे आता मानावयाचे काय? भविष्यकाळात लढली जाणारी युद्धे या प्रश्नांची उत्तरे देणार आहेत. ■

## वाचक पत्र

### संकटाकडे डोळे उघडून पाहा

जून २०२६ च्या उत्तरार्धात युरोपमध्ये आलेली भीषण उष्णतेची लाट ही हवामान बदलाची एक गंभीर चेतावणी आहे. फ्रान्स, जर्मनी, ब्रिटनसह अनेक देशांत तापमान ४०-४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. यामुळे १३०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. युरोपसारख्या थंड मानल्या जाणाऱ्या प्रदेशाला जर असा तडाखा बसत असेल, तर आपण किती धोक्यात आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. ही घटना भारतासाठी 'वेक-अप कॉल' आहे. युरोपमधील ही परिस्थिती भारतासाठी थेट हवामानशास्त्रीय संकट नसले तरी ती आपल्या भविष्यातील धोक्यांची घंटा आहे. जागतिक तापमान वाढीमुळे हे संकट आता जगभर पसरले आहे, ज्याची तीव्रता भारततही वर्षानुवर्षे वाढत आहे. उष्णतेमुळे वाढणाऱ्या हृदयविकार आणि श्वसनाच्या समस्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी हे संकट जीवघेणे ठरत आहे. बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी आता आपण अधिक सज्ज होणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करणे, हीच काळाची गरज आहे. ■

**प्रिया बागडदेव**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार वितरण समारंभ आनंदवन येथे होणार

## अशोक भवरलालजी जैन यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. अक्षयकुमार काळे, दिलीप पांढरपट्टे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. गिरीश कुलकर्णी व आमटे परिवार यांची उपस्थिती लाभणार



बाबा व साधना ताई आमटे | प्रा. कौतिकराव ठाले पाटील व अनुराधा पाटील | अशोक भवरलालजी जैन | डॉ. अक्षयकुमार काळे | दिलीप पांढरपट्टे | प्रा. डॉ. रणधीर शिंदे | प्रा. डॉ. गिरीश कुलकर्णी | पद्मश्री डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी ताई आमटे | डॉ.विकास व डॉ. भारती आमटे

**अंबाजोगाई :** थोर समाजसेवक बाबा आमटे आणि त्यांच्या कार्याला खंबीर साथ देणाऱ्या साधनाताई आमटे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी येथील साधना सेवाभावी संस्थेच्या वतीने साधनाताई आमटे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे (१९२६–२०२६) औचित्य साधून २०२६ पासून 'साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार' दिला जाणार आहे. या वर्षीचा पहिला पुरस्कार छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ कवयित्री व लेखिका अनुराधा पाटील व ज्येष्ठ लेखक व मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील या दांपत्याला अशोक भवरलालजी जैन, अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम ली. जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे–नागपूर, यांच्या मुख्य उपस्थितीत प्रदान केला जाणार आहे. यावेळी पनवेल येथील निवृत्त सनदी अधिकारी ख्यातनाम मराठी व उर्दू गझलकार दिलीप पांढरपट्टे, कोल्हापूर येथील साहित्य समीक्षक डॉ. रणधीर शिंदे, स्नेहालय, अहिल्यानगरचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, आनंदवनचे डॉ. विकास व डॉ. भारती आमटे, लोक बिरादरी प्रकल्प, भामरागडचे पद्मश्री डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी आमटे यांची उपस्थिती लाभणार आहे. हा पुरस्कार साधनाताई आमटे यांच्या पुण्यतिथी दिनी आनंदवन जिल्हा चंद्रपूर येथे प्रदान केला जाणार आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. शुभदा राठी–लोहिया, सचिव दगडू लोमटे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. गुरुवार दिनांक ९ जुलै २०२६ सकाळी ११ वाजता स्वरानंदवन हॉल, आनंदवन, वरोरा येथे हा समारंभ साजरा केला जाईल.

बाबा व साधनाताई यांनी कुष्ठरोगी, अंध, अपंग, मूकबधिर, आदिवासी यांच्यासाठी महारोगी सेवा समिती स्थापन करून आरोग्य, शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन, रोजगार उपलब्ध करून उत्तम व सन्मानाने, स्वाभिमानाने जगता यावे यासाठी आपले आयुष्य खर्च केले. साहित्य, कला, संगीत व ललितकला या क्षेत्रातही मोठ काम केले आहे. तसेच या क्षेत्रातील साहित्यिक, कलावंतांनी बाबांच्या कार्यात महत्त्वपूर्ण सहकार्याची भूमिका घेतली आहे. त्यासाठी हा पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. पुरस्काराचे स्वरूप शाल, स्मृतिचिन्ह, मानपत्र, पुष्पहार व एक लाख रुपये असे आहे. पहिला पुरस्कार साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय लेखन कार्य व साहित्य क्षेत्रात प्रचार व प्रसार करण्यासाठी आपले योगदान देणाऱ्या मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथील ठाले पाटील दांपत्यास हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेच्या अध्यक्ष डॉ. शुभदा लोहिया, सचिव दगडू लोमटे व सर्व पदाधिकारी यांनी केले आहे. अंबाजोगाई सारख्या गाववजा शहरातून हा पुरस्कार सुरू केल्या बद्दल महाराष्ट्रातील साहित्य, कला संगीत व ललितकला क्षेत्रातील सर्वांनी याचे कौतुक करून समाधान व्यक्त केले आहे. हा पहिलाच पुरस्कार असल्याने सर्वांना उत्कंठा लागली आहे.

# थेट शिक्षकाचीच केली तडकाफडकी बदली



**बीड :** परळी तालुक्यातील हिवरा गोवर्धन गावकऱ्यांनी पुढाकार घेत जिल्हा परिषद शाळेत 'सेमी-इंग्रजी' सुरू केले. मात्र, इंग्रजी शिकवणाऱ्या शिक्षकाची शिक्षण विभागाने तडकाफडकी बदली केली. 'आमचे सर परत द्या!' म्हणत संतप्त विद्यार्थी आणि गावकऱ्यांनी थेट प्रशासनाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे.

जिल्ह्याच्या परळी तालुक्यातील हिवरा गोवर्धन गावात इयत्ता पहिली ते सातवी जिल्हा परिषद शाळा आहे. येथील जिल्हा परिषदेच्या शाळेने प्रथमच 1 ते 7 वर्गापर्यंत सेमी इंग्लिश सुरू करण्याचा निर्णय घेत खासगी शाळांना फाटा देण्याचे काम सुरू केले होते एक वर्षापूर्वी सुरू केलेली सेमी इंग्रजी शाळा चांगलीच तालुक्यात नावारूपाला आली. मात्र, यंदा या शाळेतील एका होतकरू शिक्षकांची तालुका शिक्षण विभागाकडून अचानक तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. शिक्षण विभागाच्या या निर्णयाविरुद्ध 'आमचे सर परत द्या!' म्हणत संतप्त विद्यार्थी आणि गावकऱ्यांनी थेट आक्रमक पवित्रा घेतला आहे.

गेल्या 11 वर्षांपूर्वी बदली केलेल्या शिक्षकाने मुलांना घडवण्यासाठी आणि सेमी इंग्रजी शाळा सुरू करण्यासाठी तसेच मुलाना शिकवण्यासाठी मुलाचे योगदान दिले होते. मुलांचे भविष्य घडणारे शिक्षक म्हणून या शिक्षकाची ओळख आहे. याच शिक्षकाची अचानक माजी आमदाराच्या शिफारशीने शिक्षण विभागाने तडकाफडकी बदली केली आहे. अतिरिक्त शिक्षक म्हणून बदली केली, असा जवाब देणाऱ्या शिक्षण विभागाच्या कामावर आता गावकऱ्यांनी नाराजी दर्शवली आहे. खासगी शाळांना डावलले म्हणून सेमी इंग्लिश प्रकाराला खोडा घालण्याचा प्रयत्न केला गेला, असा आरोप गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

शिक्षकाची जागा रिक्त असतानाही बदली का?

हिवरा गोवर्धन येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत एक शिक्षकांची जागा रिक्त असताना ही बदली करायची नेमकी तालुका शिक्षण अधिकाऱ्याला गरज का भासली, असा सवाल आता गावकरी आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे. सिरसाळा ग्रामीण भागातील शैक्षणिक वातावरण विस्कळीत करून इंग्लिश स्कूलला प्रोत्साहन देण्यासाठी हे केले गेलं आहे, अशी संतप्त भावना यावेळी गावकऱ्यांनी उपस्थित केली आहे.

प्राथमिक शाळेतील शिक्षक यांची बदली करण्याचा अधिकार हा राज्य शासनाचा आहे. अंबाजोगाई तालुक्यातील दौडवाडी शाळेला तात्पुरता शिक्षक द्यायचा होता, तर आमच्या शाळेतील चांगला शिक्षक का दिला. हिवरा येथील आमच्या शाळेतील नावाजलेला शिक्षकच का द्यायचा, असा सवाल यावेळी गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

या बदली मागे आर्थिक व्यवहार असावा

केंद्र प्रमुख पांडे सांगतात की बदली जिल्हा परिषदेच्या सीओ साहेबांनी केली आहे. मात्र, तसा उल्लेख तिथं नाही. आमच्या गावातील जिल्हा परिषद शाळेतील चांगल्या विद्यार्थी प्रिय शिक्षकाची बदली नेमकी का केली असावी, असा सवाल विद्यार्थ्यांचे पालक, गावकरी आणि विद्यार्थ्यांनी यावेळी उपस्थित केला आहे. या सगळ्या प्रकारामुळे आता संपूर्ण बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

# राजाराम शेळके यांनी नेहमी कर्तव्याला प्राधान्य दिले : पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे

## 36 वर्षे निष्कलंक सेवा हीच राजाराम शेळके यांची खरी ओळख – प्रा. रवींद्र जोशी



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)...:** पोलीस उपनिरीक्षक राजाराम (राजेभाऊ) शेळके यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित गौरव सोहळ्यात त्यांच्या ३६ वर्षांच्या प्रामाणिक, शिस्तबद्ध व लोकाभिमुख सेवेचे मान्यवरांनी तोंड भरून कौतुक केले. यावेळी संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी शेळके यांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुक केले. वैद्यनाथ मंदिर पोलीस चौकीत कार्यरत असताना त्यांनी भाविकांच्या सुरक्षेची व दर्शन व्यवस्थेची जबाबदारी उत्कृष्टरीत्या सांभाळली. त्यांच्या कामाबाबत कधीही तक्रार आली नसल्याचे ढोणे यांनी सांगितले.

पत्रकार तथा प्रा. रवींद्र जोशी यांनी राजेभाऊ शेळके यांच्या जीवनकार्याचा गौरव करताना सांगितले की, ३६ वर्षांच्या सेवाकाळात त्यांच्यावर एकदाही शिस्तभंगाची कारवाई झाली नाही. उलट उत्कृष्ट सेवेसाठी त्यांना सुमारे २८ वेळा गौरविण्यात आले. ते उत्कृष्ट कबड्डीपटू होते व त्याच क्रीडा गुणवत्तेच्या जोरावर पोलीस दलात दाखल झाले. लोकांशी मैत्रीपूर्ण संबंध, संवेदनशील स्वभाव आणि गुन्हे तपासातील कौशल्यामुळे त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली, असेही प्रा. जोशी म्हणाले.

यावेळी पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, पोलीस उपनिरीक्षक नितीन गट्टावार, माजी पोलीस उपनिरीक्षक व्यंकट भताने, निळकंठ चाटे, बापूराव नागरगोजे, प्रल्हाद मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी राजाराम शेळके यांचा सपत्नीक सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास पोलीस अधिकारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार, मित्रपरिवार, नातेवाईक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन पत्रकार धनंजय आरबुने यांनी केले.

# पर्यावरण जनजागृतीसाठी तुलसी कॉलेजची रॅली




**बीड (प्रतिनिधी) :** देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित वन महोत्सव सप्ताह अंतर्गत सोमवारी (दि. ६ जुलै) शहरात पर्यावरण जनजागृती रॅली काढण्यात आली. झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण वाचवा, देश वाचवा अशा विविध घोषणा देत विद्यार्थिनींनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

सोमवारी सकाळी महाविद्यालयाच्या प्रांगणातून या रॅलीला सुरुवात झाली. हातामध्ये पर्यावरणाचा संदेश देणारे फलक घेऊन विद्यार्थिनी रॅलीमध्ये सहभागी झाल्या होत्या. शहरातील प्रमुख मार्गांवरून फिरत या रॅलीच्या माध्यमातून वृक्षारोपण, प्लास्टिक मुक्ती आणि जलसंधारणाचा संदेश देण्यात आला.

या रॅलीचे नियोजन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.श्वेता वंजारे यांनी केले. रॅलीच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे तसेच सर्व प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मतदार पडताळणी प्रक्रियेत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा-अनिलदादा जगताप

## शिवसैनिकांनी घरोघरी पोहोचून मतदार पडताळणी पूर्ण करून घ्यावी : अनिलदादा जगताप यांच्या सूचना!



**बीड, प्रतिनिधी-:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष मतदार पडताळणी मोहिमेत प्रत्येक नागरिकाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आवश्यक कागदपत्रे व माहिती वेळेत सादर करावी, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मतदार पडताळणी मोहिमेत सक्रियपणे सहभागी होत असून, नागरिकांपर्यंत ही प्रक्रिया सुलभपणे पोहोचविण्याचे काम करत आहेत. नागरिकांनीही ही केवळ शासकीय प्रक्रिया न समजता आपली लोकशाहीप्रती असलेली राष्ट्रीय जबाबदारी म्हणून सहकार्य करावे, असे आवाहन जगताप यांनी केले. येत्या काही दिवसांत तहसील कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची वेळ येऊ नये, यासाठी घरी येणाऱ्या बीएलओ (BLO) अधिकाऱ्यांना आवश्यक कागदपत्रे व भरलेले फॉर्म वेळेत उपलब्ध करून द्यावेत, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना अनिलदादा जगताप म्हणाले, "आज थोडासा वेळ देऊन मतदार पडताळणीची प्रक्रिया पूर्ण केल्यास उद्याच्या अनेक अडचणी सहज टाळता येतील. मतदार यादी अचूक आणि अद्ययावत ठेवणे ही प्रत्येक जबाबदार नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे."

मतदार पडताळणी प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास नागरिकांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे संपर्क साधावा. नागरिकांच्या सेवेसाठी शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक सदैव तत्पर असल्याचेही अनिलदादा जगताप यांनी स्पष्ट केले.

# शेतकऱ्यांना नापिकी आणि कर्ज या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी योजना

## अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना

राज्यातील शेतक-यांना निसर्गाचा लहरीपणा सांभाळत शेती करावी लागते आणि त्या शेतीसाठी मेहनत घेऊनही अनेकदा अतिवृष्टी दुष्काळ यामुळे पिकांचे नुकसान होत असते. पीक आले नाही तर उत्पन्न नाही आणि परिणामी शेतीसाठी बँकेकडून घेतलेले कर्ज फेडणे शक्य होत नाही. या मुळे शेतकरी वर्ग सतत चिंतेत असतो. शेतकरी वर्गास नापिकी आणि कर्ज थकणे या दुष्टचक्रात अडकून पडावे लागते.

शेतकरी वर्गास प्राधान्य देणाऱ्या सरकारने यासाठीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना २०२६ ही जाहिर केली आहे. या रूपाने ही आजवरची सर्वात मोठी आणि राज्यातील ५८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देणारी महाकर्जमुक्ती ठरली आहे.

शेतकरी बांधवांना २ लाख रुपयांपर्यंत असणारे कर्ज माफ होणार आहे. ज्यांचे कर्ज २ लाखांपेक्षा अधिक आहे अशा शेतकऱ्यांनी २ लाख रुपयांपेक्षा जादा असलेला थकीत कर्जाची रक्कम भरल्यानंतर त्यांनाही याचा लाभ मिळणार आहे. आणि जे शेतकरी कर्ज घेऊन त्याची नियमित परतफेड करतात अशा शेतकऱ्यांचाही विचार या योजनेत झाला आहे. नियमित कर्जाचे हप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम या कर्जमुक्ती मोहिमेत दिली जाणार आहे.

शासन स्तरावर शेतकरी वर्गास प्राधान्य देण्याची जी भूमिका आहे त्याचाच एक भाग म्हणून याकडे आपणास बघता येईल. शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतानाच पिकाचा विमा घेण्याचा सल्ला दिला जातो आणि त्यांच्या पिकाचा विमा देखील काढला जातो. ही योजना प्रधानमंत्री फसल विमा म्हणून सर्वांना परिचित आहे. या अंतर्गत वेळोवेळी पिकाचे नुकसान आलेल्या शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी भरपाई दिलेली आहे.

# आदित्य डेंटल कॉलेजमध्ये राष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा दिन

**बीड :** समाजात मुख आणि दंत आरोग्याविषयी व्यापक जागरूकता निर्माण करून सर्वांनी आनंदी,निरामय आणि सकारात्मक जीवन जगणे गरजेचे आहे, याच उद्देशाला समोर ठेवून बीड येथील आदित्य डेंटल कॉलेजमध्ये 'राष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.महाविद्यालयात दिवसभर विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. अदिती सारडा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव, क्लिनिकल इन्चार्ज डॉ. समीरा कुरेशी आणि सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागाचे प्रमुख प्राध्यापक उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सेचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक सहभाग वाढविण्यासाठी दिवसभर विविध उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये तोंडाचे आरोग्य तपासणी शिबिर, विशेष प्रश्नमंजुषा स्पर्धा, दंत आरोग्याविषयी जनजागृती मोहीम असे उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमामुळे आम्हाला नवीन व्यावहारिक ज्ञान मिळाले असून आमचा आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत झाली, अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. डॉ. मंगेश अंधारे यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव, क्लिनिकल इन्चार्ज डॉ. समीरा कुरेशी, डॉ. अभिजीत मोहखेडकर, डॉ. हरि कुमार मेम्पल्ली , डॉ. अमित हांडा, डॉ. निखत, डॉ. मंगेश अंधारे, डॉ. प्रांजल लिंबगावकर, डॉ. मयूर आवचार, डॉ. सुजाता सतोसकर, डॉ. सुमैया, डॉ. मोनिका, डॉ. दीप्ती, डॉ. फरहाना, डॉ. तेजस्विनी जायभाय, डॉ. वैभवी पवार आदी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच आदित्य डेंटल कॉलेजच्या प्रशासनाने विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करावा- डॉ. आदिती सारडा

विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता शैक्षणिक तसेच सहशालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपली कौशल्ये प्रदर्शित करण्याची, ज्ञान वाढवण्याची आणि आत्मविश्वास विकसित करण्याची संधी मिळते. प्रत्येकाने आपल्या व्यावसायिक आयुष्यात उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे. आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करावे असे आवाहन डॉ. अदिती सारडा यांनी उपस्थित विद्यार्थांना मार्गदर्शन करताना केले.

# सहकार सप्ताहानिमित्त माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात वृक्षारोपण



**माजलगाव, दि. 6 प्रतिनिधी:** सहकार सप्ताहानिमित्त माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फुले पिंपळगाव मुख्य बाजार आवारात वृक्षारोपण कार्यक्रम दि. 6 जुलै रोजी दु. 1.00 वा. उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

सहकार सप्ताह वर्ष 2026 अंतर्गत माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने मुख्य बाजार आवार फुले पिंपळगाव येथे वृक्षारोपण करतांना सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, संचालक अशोकराव डक, वीरेंद्र भैय्या सोळंके, उद्धवराव नाईकनवरे, दत्तात्रय डाके, मनोजजी जगताप, संजयजी कचरे, आसारामजी घायतिडक,आबाजी भोसले,नंदकिशोरजी सजगणे,अमोलराव जाधव, नितीनराव नाईकनवरे, भागवतराव शेजुळ, भगवानराव आगे, प्रभाकरराव होके, कदीर पठाण व सचिव हरिभाऊ सवणे , लेखापाल उद्धव फपाळ व सर्व अधिकारी,कर्मचारी बांधव उपस्थित होते. सहकार सप्ताहानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करत पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्यांची जोपासना करावी, असे आवाहन करण्यात आले.

# एसबीआय एटीएम फोडणारी टोळी जेरबंद; 3 आरोपी अटकेत, महिंद्रा मॅक्स वाहन जप्त



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरातील बस डेपो परिसरातील अण्णाभाऊ साठे चौकाजवळ असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) च्या एटीएममध्ये फोडाफोड करून रोकड चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीचा अंबाजोगाई शहर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत पर्दाफाश केला. या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, गुन्ह्यात वापरण्यात आलेले महिंद्रा मॅक्स वाहन जप्त करण्यात आले आहे. या जलद कारवाईबद्दल अंबाजोगाई शहर पोलिसांचे कौतुक होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ३ जुलै २०२६ रोजी पहाटे सुमारे २.१३ वाजण्याच्या सुमारास अज्ञात आरोपींनी बस डेपोजवळील एसबीआय एटीएमचे लॉक व बाहेरील भाग फोडून मशीनमधील रोकड चोरण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचवेळी परिसरात गस्त घालणाऱ्या पोलिस वाहनाचा सायरन ऐकू आल्याने आरोपींनी चोरीचा प्रयत्न अर्धवट सोडून घटनास्थळावरून पलायन केले. या घटनेप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २७५/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२),६२, ३२४ व ३ (५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. घटनेनंतर पोलिसांनी शहरातील विविध ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने परीक्षण केले. तपासादरम्यान संशयित वाहन परळीच्या दिशेने गेल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर परळी शहरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून वाहनावरील सांकेतिक चिन्हांच्या आधारे वाहन व संशयितांची ओळख पटविण्यात आली. यानंतर अंबाजोगाई पोलिसांनी परळी शहर पोलीस ठाणे व परभणी येथील स्थानिक गुन्हे शाखेशी (एलसीबी) समन्वय साधला. एलसीबी परभणीच्या मदतीने आरोपींना ताब्यात घेण्यात आले व त्यानंतर त्यांना अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात आणून अटक करण्यात आली.

**अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे :** परमेश्वर सोनाभाऊ बनगर (रा. झरी, ता. मानवत, जि. परभणी), राजेश भाऊसाहेब कांबळे (रा. कोल्हा, ता. मानवत, जि. परभणी), विवेक बबन धारे (रा. कोल्हा, ता. मानवत, जि. परभणी), या गुन्ह्यात वापरण्यात आलेले महिंद्रा मॅक्स वाहन पोलिसांनी जप्त केले असून, या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रकाश गायकवाड करीत आहेत.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस हवालदार पांडुरंग काळे, प्रकाश गायकवाड, अनिल डोंगरे, संदीप मुंडे, बदाम आरसूळ, हनुमंत चादर, हनुमंत लाड तसेच पोलीस अंमलदार बाबासाहेब घुगे यांच्या पथकाने पार पाडली.

# खा. डॉ. रामराव वडकुते यांचेहस्ते नांदेड-कुर्ला एक्सप्रेसला हिरवी झेंडी

## भाजप पदाधिकाऱ्यांसह रेल्वे संघर्ष समितीने केले रेल्वेचे स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जुलै**

नांदेड-कुर्ला या नव्या रेल्वे गाडीचे हिंगोली रेल्वे स्थानकावर प्रथमच आगमन झाले असता, हिंगोलीकरांनी अत्यंत जल्लोषात आणि ऐतिहासिक असे स्वागत केले. भाजपा नेते खासदार डॉ. रामराव वडकुते यांच्या प्रमुख उपस्थितीत ढोल-ताशांचा गजरात, फटाक्यांची आतिषबाजी करत या रेल्वेचे स्वागत करण्यात आले. यावेळी खासदार डॉ.वडकुते यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून पुढील प्रवासासाठी रवाना केले.

या नव्या रेल्वे सुविधेमुळे हिंगोली जिल्ह्यातील नागरिक, उच्च शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी आणि व्यापारी वर्गाला थेट मुंबई (कुर्ला) गाठण्यासाठी एक हक्काचा व सोयीचा मार्ग उपलब्ध झाला आहे.

या प्रसंगी बोलताना खासदार डॉ. रामराव वडकुते यांनी, हिंगोलीकरांची ही महत्त्वाची मागणी मान्य केल्याबद्दल देशाचे रेल्वेमंत्री आणि रेल्वे प्रशासनाचे मनापासून आभार मानले. ही नवी रेल्वे सेवा केवळ प्रवासाची सोय नसून, यामुळे हिंगोली जिल्ह्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी भाजपा युवामोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, युवानेते शशिकांत वडकुते, सुनिताताई मुळे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, संजय कावडे, रजनीश पुरोहीत, बाबाराव घुगे, निखील बांगर, शिवा घुगे, क्रिष्णा रुहटिया, रजनी पाटील, माणीक लोडे, कैलाश शहाणे, बंडु करहाळे, गुड्डू देवकते आदींची उपस्थिती होती.

तसेच रेल्वे समितीचे राकेश भट्ट गोवर्धन अण्णा वीरकुंवर, नंदकिशोर तोष्णीवाल, खलील बेलदार, जेठानंद नेनवाणी, गणेश साहु, शेख नौमान यांच्यासह रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्ह्यातील रेल्वे समितीचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, रेल्वे प्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोलीत कामगारांच्या प्रश्नांवर रिपब्लीकन सेनेची तीव्र निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जुलै**



हिंगोली जिल्हा कामगार कल्याण मंडळ कार्यालयातील प्रचंड अनागोंदी, भ्रष्टाचार, कामगारांवरील अन्याय आणि गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध योजनांच्या प्रश्नांच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेच्या वतीने आज युवा प्रदेशाध्यक्ष किरणभाऊ घोंगडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कामगार कल्याण मंडळ कार्यालयासमोर दुपारी बारा वाजता दरम्यान तीव्र निदर्शने करण्यात आली.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाच्या निष्क्रिय कारभाराचा तीव्र निषेध केला. त्यामुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. निवेदनामध्ये सध्याच्या कामगार अधिकाऱ्यांची तात्काळ बदली, संशयास्पद मंजूर प्रकरणांची चौकशी, नाकारलेल्या अर्जांची लेखी कारणे, मागील दोन वर्षांपासून प्रलंबित शिष्यवृत्ती, कॉलरशिप, वैद्यकीय क्लेम व इतर लाभांचे तातडीने वितरण, तसेच नोंदणीकृत कामगारांसाठी अवव चशालशअॅ आणि मोबाईल क्रमांक बदलण्याची ऑनलाइन सुविधा सुरू करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली.

आंदोलनाची दखल घेत कामगार अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. कार्यालयातील प्रलंबित कामगारांची सर्व कामे तातडीने मार्गी लावण्यात येतील तसेच पात्र कामगारांना विविध योजनांचे लाभ लवकरात लवकर देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी व तोंडी आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर रिपब्लिकन सेनेच्या वतीने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. मात्र, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची तातडीने अंमलबजावणी केली नाही, तर यापेक्षाही अधिक तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा युवा प्रदेशाध्यक्ष किरणभाऊ घोंगडे यांनी दिला. यावेळी युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, मराठवाडा महासचिव विक्की काशिदे, जिल्हा संघटक गोरखनाथ खिल्लारे, आकाश कांबळे, रामदास ढगे, सुमेध पाईकराव, योगेश भालेराव, लखन ढगे, युवराज पठाडे, राहुल भालेराव, अजय वाढवे, संजय शिंदे, अनिल राठोड, सुंदर आडे, नामदेव खिल्लारे,यांच्यासह रिपब्लिकन सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांची रिक्तपदे भरण्यासाठी ग्रामस्थांनी ठोकले शाळेला टाळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जुलै**



सेनगाव तालुक्यातील सवना येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची ९ पदे मंजूर असतांना केवळ तीनच शिक्षक कार्यरत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी सोमवार दि ६ जुलै रोजी शाळेला टाळे ठोकत तत्काळ रिक्तपदे भरण्याची मागणी केली आहे.

सेनगाव तालुक्यातील सवना जिल्हा परिषद शाळेत १० वीपर्यत वर्ग आहेत. शाळेत सुमारे २५० विद्यार्थी शिकत आहेत. विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिक्षकांची ९ पदे मंजूर आहेत मात्र मागील काही दिवसांपासून शिक्षकांची केवळ तीनच पदे भरलेली असून या शिक्षकांनाच वर्ग सांभाळावे लागत आहेत. त्यातही दोन शिक्षक विशेष मतदार पूनरिक्षण कामात असल्याने एकाच शिक्षकावर सध्या शाळा सुरू आहे. रिक्तपदांमुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आह. परिणामी गुणवत्तेवर परिणाम होत आहे. या शाळेत शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत अशी मागणी करण्यात आली परंतु शिक्षण विभागाने अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या प्रकारामुळे दि ६ जुलै रोजी संतप्त ग्रामस्थांनी शाळेला टाळे ठोकले. यावेळी अॅड प्रवीण नायक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील नायक, राजेश नायक, बालासाहेब नायक, शिवाजी नायक, बबन नायक, किशोर भालेराव, धनंजय वानखेडे, दिपक नायक यांच्यासह पालकांची उपस्थिती होती. शाळेला कुलूप असल्याने विद्यार्थी देखील अर्धा तास वाट पाहून घरी गेले. जोपर्यंत शाळेत शिक्षकांची नियुक्ती होत नाही तोपर्यंत शाळेचे कुलूप उधडले जाणार नाही अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.



**हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात काँग्रेसच्या ओबीसी आघाडीची बैठक पार पडली. यावेळी ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा यशपाल भिंगे, जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते, सुरेशअप्पा सराफ, डॉ रमेश शिंदे, मिलींद उबाळे आदींची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### बंद पडलेल्या बस फेऱ्या सुरू



हिंगोली- तालुक्यातील डिग्रस कऱ्हाळे रस्त्यावरून धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या बस फेऱ्या काही दिवसांपूर्वी बंद पडल्या होत्या. बस फेऱ्या बंद पडल्यामुळे डिग्रस कऱ्हाळे येथे येणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांचे व बाहेर गावातील विद्यार्थी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी फार मोठे अडचण येत होती शालेय विद्यार्थी व शेतकरी यांना जिल्ह्याच्या ठिकाणी येण्याजाण्यासाठी फार मोठी अडचण होत होती. डिग्रस गावातील सामाजिक कार्यकर्ते संतोष कऱ्हाळे यांनी पुढाकार घेऊन शालेय विद्यार्थ्यांची शेतकऱ्यांची बस सेवा बंद झाल्याने होणारी अडचण दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधीकडे बस सेवा सुरू करण्याची मागणी केली होती. या अनुषंगाने आमदार संतोष बांगर यांनी एस टी महामंडळाला आदेश देऊन बस सेवा सुरू केली. एस टी महामंडळाची बस सुरू झाल्याने चालक आणि वाहकाचा ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. बस फेऱ्या सुरू झाल्याने आमदार संतोष बांगर, सामाजिक कार्यकर्ते संतोष कऱ्हाळे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना अभिवादन



हिंगोली- भारतीय जनसंघाचे संस्थापक आणि प्रखर राष्ट्रभक्त श्रद्धेय डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंती निमित्त भाजपाचे जेष्ठ नेते खासदार डॉ.रामराव वडकुते यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यानंतर शहर भाजपाची मासिक आढावा बैठक संपन्न झाली. शहर आढावा बैठकीत पक्ष संघटनेच्या बळकटीकरणावर सखोल चर्चा झाली. आगामी काळात हिंगोली शहरात सर्वसामान्य जनतेच्या हिताचे विविध सामाजिक आणि लोककल्याणकारी उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. या उपक्रमांच्या माध्यमातून शासनाच्या योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, युवानेते शशिकांत वडकुते, उमेश नागरे, सुनिताताई मुळे, विलास गोरे, पवन उपाध्ये, बाबाराव घुगे,निखील बांगर, क्रिष्णा रुहटिया, रितेश शहाणे, सदाशिव सुर्यतळ, अमित रुहटिया, रामेश्वर गायकवाड, गुड्डू देवकते उपस्थित होते.

# नांदेड-कुर्ला रेल्वेची वेळ बदलण्याची रेल्वे संघर्ष समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जुलै**



हिंगोली जिल्हा रेल्वे संघर्ष समिती च्या वतीने या रेल्वे गाडीचे स्वागत तर केलेच परंतु पूर्वी पासून समितीने सादर गाडीचे वेळापत्रक यात्रे करूंसाठी असुविधाकारक असल्याने व मुंबईला पोहोचण्याची वेळ दुपारी दीड वाजता असल्याने या रेल्वे गाडीला प्रवासी संख्या मिळणार नाही व या मार्गावरील अधिकारी, कर्मचारी, व्यापारी, विद्यार्थी व प्रवाशांच्या कोणत्याही कामाची नसून या रेल्वेची वेळ बदलावी म्हणून दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांना रेल्वे स्टेशन मास्टर यांच्यामार्फत चुकीच्या वेळेचा निषेध म्हणून काळा रुमाल पांघरून रेल्वेचा वेळ बदलण्याची मागणी करण्यात आली आहे. सदर रेल्वेचा वेळ हा दिनांक १९ मे २०२६ रोजी या रेल्वे गाडीच्या शुभारंभ करता जे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते ज्यामध्ये सदरची रेल्वे गाडी सायंकाळी चार वाजता नांदेडहून निघून कुर्ल्याला सकाळी ७.५० ला पोहोचणार अशी होती हीच वेळ कायम करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे निवेदनावर हिंगोली जिल्हा रेल्वे संघर्ष समितीचे नंदकिशोर तोष्णीवाल गोवर्धनअण्णा वीरकुंवर, वसंत भट्ट, शेख खलील बेलदार, कैलास शहाणे, शेख नोमान शे.नईम, गोविंद प्रजापती, शेख जमील बागवान, गणेशलाल साहू, शेख नफीस पैलवान, शेख मझहर यांच्यासह मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते.

# हिंगोली जिल्ह्यातील माजी कबड्डी खेळाडूंचा संघटनेकडून गौरव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जुलै**

हिंगोली जिल्हा कबड्डी क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या माजी खेळाडू यांचा गुणगौरव राज्यस्तरावरील पुरस्कार प्रदान करून १५ जुलै २०२६ रोजी रत्नागिरी येथे राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने करण्यात येणार आहे. प्रत्येक वर्षी १५ जुलै हा कबड्डी महर्षी बुवा साळवी यांचा जन्मदिवस महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने कबड्डी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी कबड्डी क्षेत्रात ज्या-ज्या सन्मानीय कार्यकर्त्यांनी योगदान दिले अशा व्यक्तींना विविध पुरस्कारांनी सन्मानित केले जाते.

यामध्ये वाकोडी येथील शेतकरी नेते व माजी कबड्डी खेळाडू खंडबाराव नाईक यांना कबड्डी खेळासाठी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल ज्येष्ठ कार्यकर्तापुरस्काराने अमृत कलश देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. खंडबाराव नाईक हे हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशनचे संस्थापक सदस्य म्हणून काम करतात.

कबड्डीचे राष्ट्रीय खेळाडू डॉ. शिवशंकर कापसे ज्यांनी बहिर्जी क्रीडा मंडळाला अनेक सामने एकहाती जिंकून दिले.तसेच उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून आजही मैदानावर उपस्थित असतात त्यांचाही महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने स्व.रमेश देवाडीकर यांच्या स्मरणार्थ श्रमयोगी कार्यकर्ता पुरस्कार अमृत कलश देऊन गौरविण्यात येणार आहे.हिंगोली पोलीस दलातील राष्ट्रीय खेळाडू सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक श्री सुदाम जोगदंड यांना जेष्ठ खेळाडू म्हणून ज्येष्ठ खेळाडू अमृत कलश देऊन पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सन्मानित करण्यात येणाऱ्या तीन्ही मान्यवरांचे हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष माजी खा. अॅड शिवाजीराव माने, उपाध्यक्ष बंडू पाटील, अॅड बाबा नाईक, सरकार्यवाह प्रा. डॉ. नवनाथ लोखंडे, सहसचिव दिलीप बांगर, कोषाध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे प्रा .एन एस.बांगर तसेच सर्व असोसिएशनचे सदस्यांकडून गुणवंतांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# औंढा नागनाथ तालुक्यात समाधानकारक पाऊस, पेरणीला सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जुलै**



औंढा नागनाथ तालुक्यात मागील आठवड्यात रिमझिम ते दमदार पाऊस सुरू झाल्याने पेरणीच्या कामांना वेग दिला आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील अनेक भागात शेतशिवारात शेतीकामांची लगबग पाहायला मिळत असून बळीराजा सुखावला आहे. पावसाच्या भरोशावर पेरणीला शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे. सोयाबीन, मूग, उडीद या पिकाची पेरणी तर हळद, कापूस, तूर या पिकाची लागवड करत आहेत. औंढा नागनाथ तालुक्यातील शेतशिवारात ट्रॅक्टर व बैलजोडीच्या साह्याने तिफणीवर सोयाबीन मूग उडीद या पिकाची पेरणी कुटुंबाला घेऊन पेरणी करताना शेतकरी राजा शेतशिवारात दिसत आहे. तसेच कृषी केंद्रावाले चढ्या दराने शेतकऱ्यांना खत विक्री करत आहेत.

अजूनही रिमझिम पाऊस असून चागंल्या पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी आहे. दरम्यान रिमझिम व तुरळक झालेल्या पावसावर शेतकऱ्यांनी आता मोठा पाऊस होईल या अपेक्षेने जोखीम पत्करून पेरणी करायला सुरुवात केली आहे. यंदा पाऊस उशिरा आला तरीही आपापल्या सोयीनुसार महागडे खते व बियाणे शेतकऱ्यांनी खरेदी केली आहेत. पेरणीनंतर बियाणे उगवण क्षमतेसाठी जमिनीत ओलावा आवश्यक आहे. यासाठी मोठ्या पावसाची गरज आहे. पडत असलेला रिमझिम व तुरळक पाऊस ही थांबल्याने शेतकऱ्यांनी जोखीम घेऊन पेरणी घेतली आहे.शेतकऱ्यांनी महागडी खते व बियाणे वापरत पेरणी केल्याने आता शेतकऱ्यांचे लक्ष आभाळाकडे लागले आहे. दमदार पावसाची प्रतिक्षा आहे.

# तीर्थक्षेत्र यशवाडी दुर्घनेतील मृतांना आर्थिक मदत व मोफत उपचार द्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जुलै**



परभणी जिल्ह्यातील यशवाडी येथील हनुमान मंदिराचा सभा मंडप कोसळून त्यामध्ये काही जणांना प्राण गमवावे लागले तर काहीजण गंभीर जखमी झाले आहेत. मयतांना २५ लाख रूपये तर गंभीर जखमींना १० लाख रूपये आर्थिक मदत व जखमींना मोफत उपचार मिळावेत. या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची मागणी आम्ही हिंदू रक्षक हिंगोलीकर संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

परभणी जिल्ह्यातील यशवाडी येथील हनुमान मंदिराचा सभा मंडप दि २० जून शनिवारी अचानक कोसळला. यावेळी दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. अचानक सभामंडप कोसळल्यामुळे तेथे असलेल्या भाविकांपैकी काहीजणांचा मृत्यू झाला तर काहीजण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेची उच्चस्तरीय सखोल चौकशी करावी तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित बांधकाम प्रक्रिया, परवानग्या व जबाबदार घटकांची भूमिका तपासण्यात यावी, मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी २५ लाख तर गंभीर जखमींना १० लाख रूपये आर्थिक मदत करावी, सर्व जखमींचा वैद्यकीय खर्च शासनाने उचलावा आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. निवेदनावर राजेंद्र हलवाई, कैलाश श्रीनाथ, रोहीत श्रीवास, सीताराम दराडे, केशव सुरदुसे, बालाजी नेमाडे, संतोष सहातोंडे, गणेश जाधव, सुनील गावंदे, शाम नेमाडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## 'पोलीस आपल्या सोसायटीमध्ये' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ जुलै : गुन्हे घडल्यानंतर कारवाई करण्याबरोबरच गुन्हे होण्यापूर्वीच त्यांना प्रतिबंध घालणे, नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि पोलीस व नागरिक यांच्यातील विश्र्वासाचे बंध अधिक दृढ करणे, या उद्देशाने लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेला पोलीस आपल्या सोसायटीमध्ये हा अभिनव उपक्रम नागरिकांच्या मोठ्या प्रतिसादात यशस्वीपणे सुरू आहे. १५ जून २०२६ पासून प्रारंभ झालेल्या या उपक्रमाने अल्पावधीतच शहरी भागातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट केली असून पोलीस दलाविषयीचा विश्र्वासही वृद्धिंगत केला आहे.

उपक्रमाच्या माध्यमातून लातूर शहरातील विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, दुय्यम पोलीस अधिकारी तसेच संबंधित बीट अंमलदार यांनी आतापर्यंत १०० हून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांना, रहिवासी एरियाना प्रत्यक्ष भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला आहे. प्रत्येक सोसायटीमध्ये जाऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेणे, त्यांच्या शंकांचे निरसन करणे आणि सुरक्षिततेबाबत आवश्यक मार्गदर्शन करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून त्यास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



## विविध वृत्त...

### शासकीय रुग्णालयात एमआरआय मशीन २० जुलैपासून कार्यरत



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ जुलै : येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास एमआरआय मशीन प्राप्त झाली आहे. येत्या २० जुलैपासून एमआरआय मशीन सुरु होण्याची शक्यता आहे. गेल्या चार वर्षांपासून एमआरआय मशीनची प्रतीक्षा होती.

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) या तत्वावर एमआरआय मशीन मिळाली आहे. गेल्या १५ दिवसांपुर्वी मशीनचे सर्व इन्स्ट्रुमेट येथील रुग्णालयास प्राप्त झाले

आहेत. त्याची जोडणी सध्या सुरु आहे. फाऊंडेशन करुन त्याची उभारणी करावी लागते. मशीनमध्ये सर्व मॅग्नेटिक पार्टस् असल्याने त्याचे फाऊंडेशन उभे करण्यास थोडा वेळ लागतो. एमआरआय मशीन सुरु झाल्यानंतर ती रुग्णांना शासन दराप्रमाणे उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

### मुरूड प्रकल्पांतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनिस पदभरती

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ जुलै : एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प मुरूड ता. लातूर जि. लातूर जिल्हा परिषद लातूर अंतर्गत अंगणवाडी सेविका व मतदनिस या पदाकरीता सरळ नियुक्तीने या रिक्त पदाची भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

त्यासाठी पात्र महिला उमेदवारांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांना १७ जुलै पर्यंत एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प मुरूडच्या कार्यालयात अर्ज करता येणार आहेत.

मुरूड प्रकल्पातील शिराळा, जेवळी, आखरवाई, निवळी, चिंचोली, भोसा, एकुर्गा, माटेफळ, करकटा, पिंपरी अंबा या गावात अंगणवाडी सेविका व मदतनिसांची पदे भरली जाणार आहेत. त्यामुळे महिला उमेदवारांना संधी मिळणार आहे. पात्र महिला उमेदवारांनी अर्ज करण्याचे आवाहन मुरूडचे बाल विकास प्रकल्प अधिकारी जे. डी. माळी यांनी केले आहे.

### 'स्वीट कॉर्न'ची आवक वाढली

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ जुलै : हिरव्या मक्याच्या कणसाची लातूर शहराच्या बाजारात आवक वाढली आहे. ठोक बाजारात स्वीट कॉर्न मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने त्याच्या दरात घसरण झाली आहे. मागील आठवड्यापासून हिरव्या गोड मक्याच्या कणसाची आवक बाजारपेठेत सुरु आहे.

## पालकांनी मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जायला प्रोत्साहित करावे : बाबासाहेब पाटील

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ जुलै : आजच्या काळात पालकांनी संपत्ती जपण्यापेक्षासंतती जपण्यास प्राधान्य देणे आवश्यक बनले आहे. आपल्या मुलांवर चांगले संस्कार करावेत. संस्कार हे पुस्तकातमिळत नाहीत तर कुटुंबात मिळतात. मुलांना आपल्या आवडीप्रमाणे नव्हे तर त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जायला प्रोत्साहित करावे तारचत्यांचेभवितव्य उज्वल घडेल असा विश्र्वास राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.

श्री केशवराज शैक्षणिक संकुलाच्या वतीने दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या गुणवंतांच्या गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवीण सरदेशमुख हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती शिल्पाताई करमरकर ह्या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगरचे प्रसिद्ध उद्योजक विवेक देशपांडे उपस्थित होते. यावेळी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, अविनाश तळणीकर ,धनंजय तुंगीकर,केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समितीचे अध्यक्ष (माध्य.) गंगाधर खेडकर, मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, शिवाजी हेंडगे, प्राचार्या सोनाली दर्डा, वर्षा डोईफोडे, शिशुवाटिका प्रधानाचार्या अवंती कुलकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बाबासाहेब पाटील आणि इतर मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह सन्मान करण्यात आला. आपल्या मार्गदर्शनात बाबासाहेब पाटील यांनी जीवनात आज संवादाची कमतरता झाल्याचे सांगितले. पालकांनी मुलांना हिणवण्याऐवजीत्यांचे कौतुक करावे. त्यांना प्रोत्साहन द्यावे. मुलांना त्यांच्या बुद्धयांकाप्रमाणेचालू द्या. प्रत्येकाने आपल्या कामाला न्याय दिल्यासत्यासारखा दुसरा आनंद नसतो. आपल्याला सहकार मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. आपण या क्षेत्रासाठी जेवढे चान्गलेकरता येईल तेवढे करत आहोत.चांगल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांप्रमाणेआदर्श शेतकरी घडला पाहिजे यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शिल्पाताई करमरकर यांनी आपल्या मार्गदर्शनात श्री केशवराज विद्यालयानेदिलेल्या मजबूत वैचारिक पायामुळेचआपण जीवनात यशस्वी होऊ शकल्याचे सांगितले. या शिक्षण संस्थेतशिक्षण घेतलेलाएकही विद्यार्थी आयुष्यात असफल होत नाही.एवढी तात्विक मजबुती येथील शिक्षकवृंद विद्यार्थ्यांना प्रदान करतात,असेही त्यांनी गौरवाने नमूद केले.विवेक देशपांडे यांनीहीआपल्या मनोगतात या संस्थेत शिकल्यामुळेचजीवनात यशस्वी होय शकलो, येथील कठोर शिस्तीने जीवन घडवल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोप प्रवीण सरदेशमुख यांनी केला. त्यामध्ये त्यांनी पालकांना मुलांकडून खूप अपेक्षा असतात, त्याप्रमाणे नक्कीचघडत असते असे सांगितले. विद्यार्थ्यांनीआयुष्यात आपले ध्येय - उद्दिष्ट्य छोटे ठेवू नये असेही त्यांनी आग्रहाने नमूद केले. त्याचप्रमाणे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या प्रगतीची वाटचालहीत्यांनी थोडक्यात सांगितली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश कस्तुरे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागची पार्श्र्वभूमी सविस्तरपणे विशद केली. श्रीमती कांचन तोडकर यांनी सरस्वती स्तवन प्रस्तुत केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या वतीने आदित्य गरड , कु. अमृता गोस्वामी, कृष्णा कच्छवे , कु. वेदिका मामडगे यांनी मनोगत व्यक्त केले. संतोष बीडकर यांनी वैयक्तिक गीत सादर केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन श्रीमती अर्चना ठोंबरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र जोशी, श्रीमती शैला सांगवीकर यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, धनंजय कुलकर्णी,राम जोशी, गुरूनाथ झुंजारे, कार्यक्रम प्रमुख मोरेश्र्वर देशपांडे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लातूर तालुक्यात 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम सुरू

# मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ जुलै : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदारयादी अद्ययावत करण्याची मोहीम लातूर जिल्ह्यात सुरू करण्यात आली आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत सन २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग म्हणजेच पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या मतदारांचे मॅपिंग होणार नाही, त्यांना पुढील काळात मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोर सुनावणीच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. ही संभाव्य प्रक्रिया टाळण्यासाठी मतदारांनी तातडीने आपले मतदार मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

या मोहिमेसाठी लातूर तालुक्यातील सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व पर्यवेक्षक यांना मतदारांचे मॅपिंग करणे, अस्पष्ट फोटो गोळा करून ते अद्ययावत करणे आणि डीएसई नोंदींची पडताळणी करणे या कामांसाठी ०१ जुलै २०२६ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत पूर्णवेळ कार्यमुक्त करण्यात आले आहे. हे अधिकारी या कालावधीत मतदारांच्या घरोघरी भेट देऊन माहिती संकलन, ईएफ वाटप व जमा करणे आणि डिजिटायझेशनचे काम ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत पूर्ण करणार आहेत. या मोहिमेच्या वेळापत्रकानुसार २० जून ते २९ जून २०२६ दरम्यान बीएलओंचे प्रशिक्षण व मतदारयादी छपाईचे काम पूर्ण झाले असून, घरोघरी जाऊन माहिती संकलन केल्यानंतर ०५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केली जाईल, ज्यामध्ये केवळ गणना प्रपत्र भरलेल्या व डिजिटायझेशन झालेल्या मतदारांचीच नावे समाविष्ट असतील.

यानंतर ०५ ऑगस्ट ते ०४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मतदारांना दावे व हरकती दाखल करता येतील, ज्यामध्ये नवीन मतदार नोंदणीसाठी फॉर्म नंबर ६, नाव वगळण्यासाठी फॉर्म नंबर ७ आणि दुरुस्तीसाठी फॉर्म नंबर ८ भरण्याची संधी उपलब्ध असेल. या कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती, अनमॅप्ड मतदार आणि नावात विसंगती असलेल्या मतदारांबाबतच्या सुनावणीचा व दावे-हरकती निकाली काढण्याचा कालावधी ०५ ऑगस्ट ते ०३ ऑक्टोबर २०२६ असा असेल. ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदारयादी नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली जाईल.

सुनावणीच्या वेळेस जन्मदाखला, पासपोर्ट, जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्र, कुटुंब नोंदवहीची प्रत, सरकारी जमीन किंवा घराचे दस्तऐवज, सरकारी ओळखपत्र, वन हक्क प्रमाणपत्र, राष्ट्रीय नागरिक नोंदणी किंवा १ जुलै १९८७ पूर्वी सरकारी संस्था, बँक, पोस्ट अथवा एलआयसीने दिलेले ओळखपत्र या ११ मान्यताप्राप्त कागदपत्रांपैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमांतर्गत वयोगटानुसार मॅपिंगचे नियम ठरवून देण्यात आले असून, सन २००२ च्या यादीत नाव असलेल्या मतदारांना केवळ मॅपिंग पूर्ण करावे लागेल आणि त्यांना अतिरिक्त कागदपत्रांची गरज भासणार नाही.



१ जुलै १९८७ पूर्वी जन्मलेल्या परंतु यादीत नाव नसलेल्या मतदारांना जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारे ११ पैकी एक कागदपत्र द्यावे लागेल; तर १ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ दरम्यान जन्मलेल्या मतदारांना स्वतःच्या दाखल्यासोबत आई किंवा वडिलांपैकी एकाचे जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारे कागदपत्र सादर करावे लागेल. तसेच २ डिसेंबर २००४ नंतर जन्मलेल्या मतदारांना स्वतःच्या पुराव्यांसह आई आणि वडील या दोघांचेही जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारे दस्तऐवज देणे बंधनकारक राहील. ज्यांचे २००२ च्या मतदार यादीत नाव नसेल किंवा त्यानंतर नाव नोंदणी झाली असेल, त्यांची पडताळणी आई-वडील तसेच आजी-आजोबांच्या नावाच्या आधारे केली जाणार आहे.

माहिती संकलनासाठी बीएलओ मतदारांच्या घरी तीन वेळा भेट देतील आणि मतदार घरी उपलब्ध न मिळाल्यास त्यांच्या घराबाहेर नोटीस चिकटवली जाईल. तीनही भेटींनंतरही संपर्क न झाल्यास संबंधित मतदाराला फॉर्म भरण्याची संधी मिळणार नाही आणि जे मतदार ही प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत, त्यांना मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षण मोहिमेच्या वेळी सुनावणी व पुराव्यांच्या पडताळणीनंतरच मतदार यादीत नाव समाविष्ट करता येईल, त्यामुळे सर्व मत दारांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेची जिल्ह्यात विशेष अंमलबजावणी; अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.६ जुलै : भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेचा पात्र लाभार्थ्यांना लाभ पोहोचवण्यासाठी लातूर जिल्ह्यात १९ जून २०२६ ते २० जुलै २०२६ या कालावधीत विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. ही योजना ऑगस्ट २०२० मध्ये आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत सुरू करण्यात आली असून, याद्वारे पीक काढणीनंतरची कृषी पायाभूत सुविधा आणि सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करण्यासाठी सवलतीच्या कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेमुळे शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया, वाहतूक व विपणन यांना चालना मिळून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना बँकांमार्फत मंजूर होणाऱ्या २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत, तसेच क्रेडिट गॅरंटीची सुविधा शासनामार्फत उपलब्ध करून दिली जाते.

या योजनेअंतर्गत गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव-इनपुट उत्पादन युनिट आणि कस्टमर हायरिंग सेंटर यांसारख्या इतर कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे.

या योजनेसाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी किंवा संस्था, प्राथमिक कृषी पतसंस्था, सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयं सहायता गट आणि कृषी क्षेत्रातील इतर संस्था पात्र लाभार्थी आहेत. या विशेष मोहिमेदरम्यान लातूर जिल्ह्यात व्यापक जनजागृती, शेतकरी मेळावे, कार्यशाळा, बँक समन्वय बैठका आणि लाभार्थी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील पात्र शेतकरी व संस्थांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या तालुका कृषी अधिकारी, आत्मा, कृषी विभाग अथवा जवळच्या राष्ट्रीयीकृत व अनुसूचित बँकेशी संपर्क साधावा. तसेच जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि कृषी उद्योजकांनी कृषी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा. या योजनेचा लाभ घेण्यासाठी HTTPS://AGRIINFRA.DAC.GOV.IN या संकेतस्थळावर आपले ऑनलाइन आवेदन सादर करावे, असे आवाहन लातूरच्या 'आत्मा' प्रकल्प संचालकांनी केले आहे.

## महावितरणकडून अत्यल्प दरात १ किलोवॅट क्षमतेची सोलर यंत्रणा बसवून मिळणार



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ जुलै : राज्यातील दारिद्ररेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील घरगुती वीज ग्राहकांची वीज बिलाच्या त्रासातून कायमची सु-टका करण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण 'स्मार्ट' पाऊल उचलले आहे. 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार' म्हणजेच 'स्मार्ट' योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत अत्यल्प दरात १ किलोवॅट क्षमतेचे सोलर यंत्रणा बसवून मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत लातूर परिमंडळातील तब्बल ४ लाख ८६ हजार ४४७ ग्राहक पात्र ठरणार आहेत. विशेष म्हणजे, या योजनेत केंद्र सरकारच्या अनुदानासोबतच राज्यशासनाकडून

भरघोस अतिरिक्त अनुदान मिळणार असल्याने आता सर्वसामान्यांना छतावर सौर ऊर्जा (रूफ टॉप सोलर) यंत्रणा बसविणे अत्यंत सोपे आणि खिशाला परवडणारे झाले आहे.

'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर राबविल्या जाणाऱ्या या सुवर्णसंधीचा लातूर परिमंडलांतर्गत येणाऱ्या बीड, धाराशिव व लातूर जिल्ह्यातील पात्र वीजग्राहकांनी त्वरित लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

लातूर परिमंडळातील एकूण ४ लाख ८६ हजार ४४७ पात्र ग्राहकांपैकी लातूर जिल्ह्यातील १ लाख ९७ हजार ९२१ आणि बीड जिल्ह्यातील १ लाख ४९ हजार ८६ तर धाराशिव जिल्ह्यातील १ लाख ३९ हजार ४४१ ग्राहकांचा यात समावेश आहे. यामध्ये दारिद्र्यरेषेखालील ३०५१ ग्राहकांचा समावेश असून, समाजातील प्रत्येक घटकाला यात सामावून घेण्याचा शासनाचा मानस आहे.

## लातूरचा मान उंचावणारा अभिनेता! 'घवडकुंड'च्या यशाने रॉकी देशमुख महाराष्ट्रभर चर्चेत

# रितेश देशमुखनंतर लातूरचा आणखी एक अभिनेता झळकला प्रकाशझोतात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ जुलै : मराठी चित्रपट 'घवडकुंड'च्या यशानंतर लातूर जिल्ह्याचे सुपुत्र आणि उदयोन्मुख अभिनेते रॉकी देशमुख यांच्या दमदार अभिनयाची संपूर्ण महाराष्ट्रभर चर्चा रंगू लागली आहे. चित्रपटातील त्यांच्या प्रभावी भूमिका, सहज अभिनयशैली आणि दमदार स्क्रीन प्रेझेन्समुळे प्रेक्षकांसह चित्रपट रसिकांकडून त्यांचे भरभरून कौतुक होत आहे. 'घवडकुंड'च्या यशामुळे केवळ चित्रपटालाच नव्हे, तर रॉकी देशमुख यांच्या अभिनय कारकिर्दीलाही नवी उंची मिळाली असून, लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यामुळे देऊळ बंद २ चे डायरेक्टर प्रवीण तरडे यांनीही रॉकी देशमुख यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात सर्वच जिल्ह्यात देशमुख यांचे कौतुक होत असून लातूरातील सर्वच चित्रपट ग्रहाला आज त्यांनी भेट देऊन मनसोक्त गप्पाही मारल्या आहेत.



चित्रपटाला राज्यभरातून मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पार्श्र्वभूमीवर लातूर शहरातील एमआयडीसी परिसरातील पीव्हीआर चित्रपटगृहात लातूरकरांच्या वतीने रॉकी देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पुष्पगुच्छ, शाल आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित चाहत्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन करत आगामी चित्रपटांसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

लातूर जिल्ह्याने यापूर्वी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता रितेश देशमुख यांच्या रूपाने राज्याला एक मोठा कलाकार दिला. आता त्याच परंपरेत रॉकी देशमुख यांनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि अभिनय कौशल्याच्या बळावर चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. 'घवडकुंड'मधील त्यांच्या भूमिकेने प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवला असून, समीक्षकांकडूनही त्यांच्या अभिनयाचे कौतुक होत आहे.

चित्रपटातील त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे सोशल मीडियावरही रॉकी देशमुख यांचे नाव चर्चेचा विषय ठरत आहे. विविध स्तरांतील मान्यवर, चित्रपटप्रेमी आणि चाहत्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, लातूरकरांमध्ये विशेष आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रॉकी देशमुख यांचे हे यश केवळ वैयक्तिक नसून, लातूर जिल्ह्यातील नवोदित कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ग्रामीण भागातूनही मेहनत, चिकाटी आणि गुणवत्तेच्या जोरावर चित्रपटसृष्टीत यश मिळवता येते, याचे त्यांनी जिवंत उदाहरण घालून दिले आहे. त्यामुळे आगामी काळातही त्यांच्याकडून अधिक दर्जेदार भूमिका आणि उत्कृष्ट अभिनयाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

'घवडकुंड'च्या यशाने रॉकी देशमुख यांचे नाव राज्यभर झळकू लागले असून, लातूरच्या सांस्कृतिक आणि कलाक्षेत्राच्या इतिहासात आणखी एका नव्या पर्वाची नोंद झाली आहे.



नांदेड -हुजूर साहिब नांदेड ते लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई या एक्सप्रेसला नांदेड येथून तर दुसरी टनकपूर ते हुजूर साहिब नांदेड या दोन एक्सप्रेसला टनकपूर येथून हिरवी झेंडी दाखवून मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ झाला. यावेळी नांदेड येथून माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, विधान परिषद सदस्य अमरनाथ राजूरकर, महापौर कविता मुळे हे उपस्थित होते. दक्षिण मध्य रेल्वेचे महाप्रबंधक संजयकुमार श्रीवास्तव, रेल्वे डीआरएम प्रदिप कामले, भारतीय रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# विवाह सोहळ्यात वृक्ष अन् संविधान उद्देशिकेचे वाटप; नरवाडे-साळवे परिवाराचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जुलै -**

लग्नसमारंभातील अवाजवी खर्चाला फाटा देत, सामाजिक बांधिलकी जपणारा एक अनोखा विवाह सोहळा नुकताच पार पडला. पासदगाव येथील राधेश्वरी मंगल कार्यालयात पार पडलेल्या या विवाह सोहळ्यात उपस्थित पाहुण्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी वृक्षारोपांची रोपे आणि भारताच्या संविधान उद्देशिकेची फ्रेम भेट देण्यात आली. नरवाडे आणि साळवे परिवाराने राबवलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



नेरली कुष्ठधाम येथील चांदू नरवाडे यांची कन्या रोहिणी आणि दयफळ भोगाने (ता. परतूर) येथील अशोकराव साळवे यांचे चिरंजीव चि. विशाल यांचा शुभविवाह ५ जुलै रोजी संपन्न झाला. या सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.

वराचे वडील अशोकराव साळवे यांच्या संकल्पनेतून हा कौतुकास्पद उपक्रम आकारास आला. विवाह सोहळ्यात पारंपरिक आहेर आणि शाल-श्रीफळ यांसारख्या औपचारिकतेला फाटा देऊन, निसर्गाप्रती आणि देशाच्या संविधानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या अंतर्गत उपस्थित पाहुण्यांचे स्वागत करून त्यांना जवळपास ४०० वृक्ष आणि संविधान उद्देशिकेची फ्रेम सप्रेम भेट देण्यात आली. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, या उदात्त हेतूने प्रेरित होऊन दोन्ही परिवारांनी घेतलेला हा निर्णय इतरांसाठी आदर्श आणि मार्गदर्शक ठरणारा आहे. या सामाजिक उपक्रमाची सध्या जिल्ह्यात जोरदार चर्चा असून, वधू-वरांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# मतदान शुद्धीकरण यादीसाठी बीएलओ यांना सहकार्य करा : सूर्यकांत हनवते

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ६ जुलै -**

निवडणूक आयोगाकडून सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरनिरीक्षण मोहिमेच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे ,चैतन्य देशमुख, संयोजक नितीन काळे, नांदेड उत्तर जिल्हा प्रभारी किरण पाटील व नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनात व नेतृत्वात भारतीय जनता पार्टी हदगाव पश्चिम तालुका अध्यक्ष सूर्यकांत हनवते यांनी हदगाव पश्चिम मंडळातील पदाधिकारी कार्यकर्ते तसेच भाजपच्या बी एल ए २ यांना आपल्या बुथवरील बीएलओ सोबत समन्वय ठेवून मतदारांच्या घरी भेटी देण्याचे आवाहन केले.



यावेळी बोलताना सूर्यकांत हनवते म्हणाले की, अचूक मतदार यादीही सक्षम लोकशाहीचा पाया आहे. प्रत्येक पात्र मतदारांची योग्य नोंद होणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. एकाही पात्र मतदाराचे नाव सुटू नये आणि अपात्र व्यक्तीचे नाव राहू नये यासाठी आपण सर्वांनी दक्षता घ्यावी भारतीय जनता पार्टीच्या बी एल ए २ पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन मतदार केंद्र स्तरीय अधिकाऱ्यांना म्हणजेच बीएलओ यांना आवश्यक ती अचूक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत घरातील नवीन १८ वर्षे पूर्ण झालेली , नाव कमी झालेले, पत्ता बदललेले किंवा मृत्यू झालेले व्यक्तींची माहिती वेळेत देणे गरजेचे आहे आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे मतदार यादी अधिक शुद्धीकरण होईल यामुळे निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक होण्यास मदत होईल सर्वजण जबाबदारीने सहभागी होऊ या असे आवाहन सूर्यकांत हनवते यांनी केले.

# १० वर्षे एकाच टेबलवर ठाण मांडून बसलेल्या वरिष्ठ लिपीक सुनील मोरे यांच्यावर युवासेनेचा हल्लाबोल!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जुलै -**

सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयात तब्बल दहा वर्षांहून अधिक काळ एकाच टेबलवर कार्यरत असलेले वरिष्ठ लिपीक सुनील मोरे यांच्या बदलीसह त्यांच्या कार्यकाळातील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची जोरदार मागणी युवासेनेने केली आहे. १५ जुलै २०२६ पर्यंत प्रशासनाने ठोस कारवाई न केल्यास प्रादेशिक मंडळ कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा युवासेना उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांनी दिला आहे. यासंदर्भातील निवेदन मुख्य अभियंत्यांना सादर करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, वरिष्ठ लिपीक सुनील मोरे हे गेल्या दशकभरापासून एकाच आस्थापनातील महत्त्वाच्या टेबलवर कार्यरत असून, त्यांच्या अखत्यारीत आणखी चार वरिष्ठ लिपीक काम करत आहेत. या गटाकडून मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य प्रशासकीय कामे केली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. वादग्रस्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना आर्थिक फायद्यापोटी संरक्षण दिले जात असून, त्यामुळे विभागातील प्रशासनिक पारदर्शकता धोक्यात आली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

युवासेनेने सुनील मोरे यांची तात्काळ अन्यत्र बदली करून त्यांच्या संपूर्ण कार्यकाळातील सर्व प्रशासकीय निर्णय, फायली आणि आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. शासकीय कार्यालयात वर्षानुवर्षे एकाच जागेवर राहिल्यामुळे निर्माण झालेल्या कथित साटेलोटे आणि भ्रष्टाचाराच्या साखळीचा शोध घेण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने १५ जुलै २०२६ पर्यंत कोणतीही ठोस कारवाई केली नाही, तर मंडळ कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल. आंदोलनादरम्यान निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा स्पष्ट इशाराही सचिन पाटील यांनी दिला आहे.

## अत्याचारानंतर अल्पवयीन मुलगी गर्भवती ; नराधमाविरुध्द गुन्हा दाखल

**नांदेड** -मुदखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'नवी आबादी' परिसरात एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका अल्पवयीन तरुणीचा पाठलाग करून तिच्यावर बळजबरीने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ च्या सुमारास नवी आबादी, मुदखेड येथे घडली. पीडिता ही त्या परिसरातील एका निर्जण जागेच्या बाजूने जात असताना, तिच्या भावाचा मित्र असलेल्या आरोपी शेख जावीद शेख मकदुम याने तिचा पाठलाग केला. पीडितेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने तिचे तोंड दाबून तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. अत्याचार केल्यानंतर आरोपीने पीडितेला आणि तिच्या कुटुंबाला 'जर याबाबात कोणाला सांगितले तर तुम्हांला. व तुझ्या भावाला, आईला जिवे मारून विहिरीत फेकून देईन', अशी धमकी दिली होती. तिची वैद्यकीय तपासणी केली असता ती गरोदर असल्याचे समोर आले. हा सर्व प्रकार उघडकीस आल्यानंतर पीडितेने आपल्या आईसोबत दि. २ जुलै रोजी मुदखेड पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी याप्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपी शेख जावीद शेख मकदुम याच्याविरुद्ध २ जुलै २०२६ रोजी पोक्सोसह विविध कलमान्वये गुरनं १२३/२०२६ दाखल केला आहे.

## श्री संत गुलाबराव महाराज जयंती उत्साहात साजरी

**नवीन नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे आज सोमवार, दि.०६ जुलै, २०२६ रोजी श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते श्री संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, संतोष चव्हाण, गोविंद हंबर्डे, तुकाराम बारसे, दादाराव हंबर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी श्री संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## आदमपूर,थडीसावळी,गळेगांवात खरीप पिकांची यशस्वी पेरणी

**आदमपूर** -बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर,नवे,जुने थडीसावळी,नवे,जुने गळेगांव परिसरातील शेत शिवारात अखेर आद्रा नक्षत्रात सुरूवातीस पेरणीला शेतकऱ्यांकडून खरीप हंगामातील पेरणीला सुरूवात झाली.या भागात थोडासा पेरणीयोग्य पाऊस पडल्याने काही शेतकरी पेरणी करून घेतल्यानंतर पुन्हा एकदा थोडाथोडका पाऊस बरसल्याने अगोदर पेरणी केलेले शेतकरी आणि पाऊस कोसळल्यानंतर पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना हलकेसे समाधान लाभले आहे. खरीप हंगामातील सोयाबीन,तूर,मूग, उडीद पिकांची रिमझिम पावसातही उगवण क्षमता सकारात्मक अशीच झालेली आहे.मुसळधार पाऊस अजुनही बरसला नाही, मात्र रिमझिम पाऊस एक दिवसाआड काहीसा येतोच आहे.वातावरणात थोडासा थंडावा,नियमित वाहणारा वारा आणि हलकीशी गारव्याची शिरशिरी वातावरणात निर्माण झाल्याचे चित्र आहे. मुसळधार पाऊस नसल्याने रानाशिवारात खरीप पिकांवर गवळण गायांचा शिरकाव नजरेस पडतो आहे.त्यामुळे शेतकरी गावचो नामक या कीटकनाशकाचा वापर करीत आहेत.या नाशकामुळे गवळण गाई या कीटकांचा शिरकाव कमी होईल अशी शेतकरीवर्गांत चर्चा आहे. परिसरातील नदी,नाले अजुनही कोरडेठाक आहेत. सद्यस्थितीत खरीप हंगामातील पिके बहरत चाललेली आहेत. उगवण क्षमता समाधानकारक नजरेस पडते आहे.काही दिवसांनी पहिल्या आंतरपीक मशागतीस सुरूवात होईल.काही माळाकडील डोबी,कॅनाल आदमपूर परिसरातील पिकांत मशागत सुरू आहे.जीव, जित्राबास रानाशिवारात हिरवा चाराही उपलब्ध होतो आहे. पेरणी उरकल्यानंतर गाव परिसरातील वैष्णव भक्त वारकरीही निसंकोचपणे पंढरपूर पायी यात्रेसाठी रवाना झाले आहेत.साधक,बाधक पाऊस परिसरात आवर्जून असल्याने पुढील जोमदार पीक संदर्भात आदमपूर, थडीसावळी,गळेगांव परिसरात सकारात्मक चर्चा आहे.

# योगेश गच्चे यांना लोकसंगीतात 'बी ग्रेड' कलावंत म्हणून मान्यता

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जुलै -**

शहरातील तरोडा भागातील सांची नगर येथील उदयोन्मुख लोककलावंत तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संगीत विभागाचे विद्यार्थी योगेश गच्चे यांना सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या प्रसार भारती आणि आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने लोकसंगीत (लोकगीत) या प्रकारात 'बी ग्रेड' कलावंत म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली आहे.



योगेश गच्चे यांना यापूर्वी भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाची सीसीआरटी फेलोशिप मिळाली असून, त्यांनी संगीत विषयात एम.ए. पदवी संपादन केली आहे. लोकसंगीतामध्ये विशेष अभिरुची असलेल्या योगेश यांनी संगीत विषयातील नेट आकाशवाणीच्या स्थानिक ऑडिशन मंडळासमोर झालेल्या थेट सादरीकरणानंतर त्यांना ही मान्यता देण्यात आली असून, प्रसारणासाठी त्यांची 'बी ग्रेड' श्रेणीत निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल कला सादरीकरण विभागाच्या विभागप्रमुख डॉ. वैशाली बोदेले, समन्वयक डॉ. गजानन दांडगे, प्रा. संजय सांगवीकर तसेच डॉ. मेधा लखपती यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गवळी समाज स्मशानभूमी साठी पक्का रस्ता उपलब्ध करून देण्याची काँग्रसची मागणी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ६ जुलै -**

मुदखेड शहरातील गवळी समाज स्मशानभूमीसाठी जाणारा रस्ता उपलब्ध करून स्मशानभूमीमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मागणीचे आज मुदखेड काँग्रेसच्या वतीने पालिकेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



मुदखेड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिसरातील गवळी समाजाची स्मशानभूमी परिसरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज, स्ट्रीट लाईट, बसण्यासाठी शेड, स्वच्छता व इतर आवश्यक मूलभूत सुविधांचाही अभाव आहे. त्यामुळे अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही समस्या अनेक वर्षांपासून कायम असून वारंवार लक्ष वेधूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

या अत्यंत संवेदनशील आणि मानवी भावनांशी निगडित प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन गवळी समाजाच्या स्मशानभूमीकडे जाणारा पक्का सिमेंट काँक्रीट रस्ता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्ट्रीट लाईट, वीज, बसण्यासाठी शेड तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात या मागणीचे निवेदन मुदखेड पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी देऊन मांडणी केली आहे. या निवेदनाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा ईशाराही देण्यात आला.

यावेळी माजी नगरसेवक गंगाधर डांगे, युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मुजीब पठाण, नगरसेवक खदीरभाई, अविनाश चौदंते, जिल्हा कांग्रेसचे सचिव गिरिष कोत्तावार, सेवा दलाचे तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे, गवळी समाजाचे युवा कार्यकरते तथा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष वेदांत शेवटे, शिवानंद देवके, रमेश बोडके, विठ्ठल आचार्य , गजानन संबोड , सुभाष चौदंते, बालाजी गुळेवाड , मोईन भाई फुलवाले , राजु चौंदते,राजरत्न शिरसागर, शेख अनिस शेख शरिफ यांच्यासह मुदखेड काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# चेन्नई येथील एका दिमाखदार कार्यक्रमात अवनी करंदीकर यांना गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जुलै -**

'लेक लाडकी असते, पण जेव्हा ती कर्तृत्वाने बापाचे नाव उज्ज्वल करते, तेव्हा तो आनंद शब्दांत मांडणे कठीण असते.' गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या लेकीने 'लाईफ कोचिंग'मध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र मिळवून यशाचे नवे शिखर गाठले. हा क्षण तांबेकर-करंदीकर कुटुंबीयांसाठी अविस्मरणीय ठरला आहे.



धनंजय तांबेकर यांची कन्या आणि 'द हिडन पॉवर ऑफ मॅरिड वूमन'या पुस्तकाच्या लेखिका अवनी अथर्व करंदीकर (देवयानी) यांनी चेन्नई येथे 'लाईफ कोचिंग'मध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र (मेरिट सर्टिफिकेट) पटकावून यशाचे नवे शिखर गाठले आहे. अवनी करंदीकर यांना हे सन्मानचिन्ह भारतातील अग्रगण्य लाईफ कोच, मोटिव्हशनल स्पीकर आणि 'लाईफ बाय डिझाईन'च्या संस्थापक पूजा पुनीत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रतिभावान मार्गदर्शकाच्या हस्ते मिळालेला हा बहुमान अवनीच्या जीवनप्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करतानाच, इतरांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याची तिची जिद्द आज खर्या अर्थाने फळाला आली आहे, असे कौतुक सर्वस्तरातून होत आहे. लेकीच्या या यशाने भारावलेले वडील धनंजय तांबेकर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, 'अवनीची मेहनत, शिस्त आणि इतरांना मदत करण्याची वृत्ती आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. यश हे अंतिम ध्येय नसून, ती अधिक जबाबदार्या आणि निरंतर शिकण्याची एक सुरुवात आहे.' अवनीने यापुढील काळातही ज्ञानाच्या जोरावर समाजात एक वेगळी ओळख निर्माण करावी, अशी प्रार्थना करत त्यांनी तिला उत्तम आरोग्य आणि उत्तरोत्तर यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# टिईटी परीक्षा घोटाळ्यांविरोधात नांदेडमध्ये 'एसएफआय'ची निदर्शने

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जुलै -**

देशभरात आणि राज्यात गाजत असलेल्या 'नीट' व 'टीईटी' परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणाचा तीव्र निषेध करण्यासाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) जिल्हा समितीच्या वतीने सोमवारी (६ जुलै) दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत तीव्र निदर्शने करण्यात आली. या आंदोलनादरम्यान केंद्र व राज्य सरकारच्या शैक्षणिक धोरणांचा तीव्र निषेध नोंदवत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

एसएफआय ने निवेदनात म्हटले आहे की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या लाखो गुणवंत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि स्वप्नांशी हा क्रूर खेळ सुरू आहे. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे परीक्षा व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली गेली असून, यामुळे विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे बेरोजगार युवक-युवती आणि त्यांच्या पालकांमध्ये तीव्र संताप व अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.'नीट' पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी आणि राज्यातील 'टीईटी' परीक्षा अपयशाची जबाबदारी स्वीकारून राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी तात्काळ आपल्या पदाचा तातडीने राजीनामा दिला पाहिजे,




सध्या सुरू असलेली ११ वी क्लिष्ट 'ऑनलाईन' प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे बंद करून ग्रामीण व सर्वसामान्य भागातील विद्यार्थ्यांना सोयीची ठरेल अशी पूर्वीप्रमाणे 'ऑफलाईन' प्रवेश प्रक्रिया तातडीने सुरू करावी,अशी ठाम मागणी आंदोलकांनी केली आहे.

'टीईटी' घोटाळ्याची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय (सीबीआय) चौकशी करून मुख्य सूत्रधारांना व दोषी अधिकाऱ्यांना तात्काळ अटक करावी. तसेच भविष्यात पेपरफुटी रोखण्यासाठी दोषींना आजन्म कारावास आणि कडक दंडाची तरतूद असणारा विशेष कडक कायदा लागू करावा. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शासन नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्काचे (फी) अधिकृत बोर्ड दर्शनी भागात लावणे बंधनकारक करावे, विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडून शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून अतिरिक्त व बेकायदेशीर शैक्षणिक शुल्क (डोनेशन/जादा फी) आकारणाऱ्या शाळा व कॉलेज प्रशासनावर कडक कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात यावी, नांदेड शहरातील शासकीय आयटीआय येथील मुलांचे वसतिगृह गेल्या ८ वर्षांपासून बंद आहे. यामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याने या वसतिगृहाचे काम तातडीने सुरू करण्यात यावे आदी मागण्या करण्यात आल्या.

सदरिल मागण्यांवर प्रशासन आणि सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास, विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संपूर्ण जिल्ह्यात अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा 'सएफआय' जिल्हा समितीच्या वतीने देण्यात आला आहे. या आंदोलनात विजय लोहबंदे,मिना आरसे,पवन जगडमवार, स्वप्निल बुकतरे, विनोंद गोंविदवार, डॉ.सचिन खडके, गजानन इंगोले, विकास गायकवाड, साहेबराव सोनसळे,अमोल गायकवाड, शरद कंधारे, वैभव वाघमारे, स्वाती हाटकर, महेंद्र बनसोडे, किशोर लोहबंदे, प्रतिक मुजळगेकर, जय गायकवाड, प्रथम तारू यांच्यासह असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.